04 TO 10 JULY 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 02/07/2022 8:22 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : २८ सोमवार दि. ४ जुलै २०२२ ते रविवार दि. १० जुलै २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## ड्रायव्हरच्या लव्हस्टोरीची शोकांतिका झाली तिघींना ठार मारून स्वत:ही आत्महत्या केली

मुंबई/क्राईम रिपोर्टर

नोकराने नोकरासारखे राहायचे असते. काही नोकर मालक आणि त्याच्या कुटुंबाशी प्रामाणिक राहतात, तर काही मात्र मालकाच्या तिजोरीवर किंवा घरातील महिलांच्या अब्रूवर दरोडा घालण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक या गोष्टी मालकाने हेरायला हव्यात. पण काही मालक नोकरांच्या बाबतीत फारसे गंभीर नसतात. अशा वेळी जे चलाख नोकर असतात ते सुरुवातीला मालकाचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करतात आणि एकदा का मालकाचा विश्वास जिंकला कि मग आपोआप त्यांना संधी मिळते आणि याच संधीचा फायदा घेऊन ते मालकाचा विश्वासघात करतात. हा विश्वासघात कोणत्या स्वरूपात असेल हे सांगता येत नाही. म्हणून ज्यांच्या घरी नोकर आहेत अशा लोकांनी सावध असणे गरजेचे आहे. खास करून ज्यांच्याकडे ड्रायव्हर आहेत अशांनी अधिक सावध असणे गरजेचे आहे. कारण आजवरचा इतिहास पाहता ज्यांच्याकडे ड्रायव्हर होते त्यांनी अनेक वेळा मालकांचा विश्वासघात केला आहे. कधी मालकाच्या बायकोवर वाईट नजर ठेवतात, तर कधी मालकाच्या मुलीला नादी लावतात.






असाच एक भयंकर प्रकार कांदिवलीच्या घडला किरण दळवी या डॉक्टर महिलेकडे १० वर्ष नोकरीला असलेला शिवदयाळ सेन याचे आपल्या मुलीशीच प्रेमसंबंध असतील असे कधीच त्यांना वाटले नव्हते. पण जेंव्हा समजले तेंव्हा त्यांना धक्का बसला आणि त्यांनी शिवदयाळ याला कामावरून काढून टाकले. यावेळी आपली प्रेयसी आपल्याला साथ देईल आणि आपल्यासोबत येईल असे वाटले होते, पण ती घाबरली आणि तिने शिवदयाळची साथ सोडली. मालकिणीच्या मुलीने आपल्याला दगा दिला हे लक्षात येताच शिवदयाळ भयंकर चिडला आणि त्याने मालकीण किरण दळवी तिच्या दोन मुली मुस्कान आणि भूमी यांची हत्या करून स्वतःही आत्महत्या केली. यातील भूमी बरोबर त्याचे प्रेम होते. दरम्यान या घटनेने संपूर्ण कांदिवली परिसर हादरून गेला आहे.

कांदिवली पश्चिम येथील एका इमारतीत दळवी कुटुंब राहायचे. मूळचे इंदूरचे असलेल्या या कुटुंबाचे इंदूरमध्ये हॉस्पिटल होते. मात्र ते विकून ते मुंबईला स्थायिक झाले. त्यांच्याकडे शिवदयाळ सेन नावाचा एक ड्रायव्हर गेल्या १० वर्षांपासून कामाला होता. दरम्यान किरण दळवी यांचे पती काही महिन्यांपूर्वी इंदूरला निघून गेले. त्यानंतर किरण दळवी या त्यांच्या दोन मुली मुस्कान आणि भूमीसह राहत असत. त्यांच्या सोबत ड्रायव्हर शिवदयाळ सेनही राहायचा. मात्र त्याचे आणि किरण दळवी यांची धाकटी मुलगी भूमी यांचे प्रेम होते. या प्रेमाला अर्थातच भूमीच्या आई आणि बहिणीचा विरोध होता. त्यामुळे भूमीने सुद्धा शिवदयाळ बरोबरचे संबंध तोडले. त्यामुळे शिवदयाळने भूमी, मुस्कान आणि किरण यांची गळा दाबून हत्या केली आणि स्वतःही आत्महत्या केली. दरम्यान एका घरातून दुर्गंधी येत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेतली, तेंव्हा आत ४ मृतदेह सापडले. ते पंचनामा नाकारून ताब्यात घेऊन कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात पोर्स्टमार्टम रिपोर्ट येण्याची पोलिस प्रतिक्षा करीत आहेत, त्यानंतर अनेक गोष्टींचा उलगडा होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## कौटुंबिक वादातून भलतेच घडले मित्राच्या मदतीने पत्नीला ठार केले

घाटकोपर/एस.कुमार



मानवाने अचंबीत व्हावे अशी विज्ञानाने जोरकस प्रगती केलीय. एकविसावे शतक तर अंतराळाचे अंतरंग उलगडण्यास अधीर झाले आहे. परंतु पुरुषी अत्याचारामुळे आजही स्त्रियांना अधोगतीला सामोरे जावे लागत आहे. अंधाराचे जाळे त्याच्या आयुष्याला वेढलेले आहेत. पावलो-पावली त्यांना अपमानीत जीणे जगावे लागत आहे. इतकेच नव्हे तर पुरुषी अत्याचाराचा अतिरेक झाल्याने त्यांना निमूटपणे या जगाचा निरोप घ्यावा लागत आहे. आपण कितीही सुधारणेच्या, महिला सबलीकरणाच्या गप्पा मारीत असलो तरी स्त्रियांवरील जीव घेणे अत्याचार मात्र दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. अशाच प्रकारची घटना टिळक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.



अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय दराडे



पोलीस उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय



व.पो.निरीक्षक सुनील काळे

१९ जून रोजी ९.२० च्या सुमारास मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाकडून टिळकनगर पोलिसांना माहिती मिळाली की, घाटकोपर पूर्वकडील एम जी.रोड, तनिष्क ज्वेलर्स जवळ, एका महिलेवर वार करण्यात आले आहे. अशी माहिती मिळताच टिळकनगर पोलीस ठाणेचे रात्रपाळीचे पर्यवेक्षक पो.नि.चव्हाण व गुन्हे प्रकटीकरण पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी एका महिला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. पोलिसांनी तिला घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वी या महिलेचा मृत्यू झाला.

दिपाली सतीश जावळे (वय ३७) असे मृत महिलेचे नाव. दिपाली ही ओएनजीसी कॉलनी जवळ, शास्त्री नगर, विद्याविहार येथे आपल्या आई-वडिलांसह राहत होती. तिच्या आईचे नाव नंदा तर वडिलांचे नाव चंद्रकांत भिंगारे. वयात आलेली दीपाली मित्र मैत्रिणीत खेळत बागडत असली तरी तिच्या आई-वडिलांना तिच्या लग्नाचा विचार सतावत होता. पोरगी दिसायला चांगली आणि हुशार असल्याने योग्य जोडीदार निवडायाची जबाबदारी भिंगारे कुटुंबातील सदस्यवर आली होती. मुलीचे लग्न करण्यासाठी त्यांनी मुलाचा शोध सुरू केला. शेवटी वरळी, सेच्युंरी मिल ...पान २ वर

## एकतर्फी प्रेम अखेर जीवघेणे ठरले प्रोफेसर महिलेला गळा दाबून मारले



मयत गौरी आचारी

गोवा/क्राईम रिपोर्टर

एकतर्फी प्रेमात जर अपयश आले तर माणूस खुनशी बनतो आणि त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. आपण जिच्यावर प्रेम करतो ती आपली झाली नाही, तर इतर कुणाचीही होता नये असे दुष्ट विचार त्याच्या मनात येतात. गोव्यातील एका जीम ट्रेनरच्या बाबतीतही असेच झाले. त्याचे एका मेडिकलच्या प्रोफेसर महिलेवर एकतर्फी प्रेम होते. त्यामुळे तो तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र त्याला विनयभंगाच्या गुन्ह्यात अटक झाली होती हे समजताच तिने त्याच्याशी बोलणे बंद केले. त्यामुळे चिडलेल्या जिम ट्रेनरने तिला फसवून एका ठिकाणी नेले आणि तिची हत्या केली. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.



आरोपी गौरव

मुळचा सावंतवाडी येथील गौरव बिंद्रे हा सध्या जुने गोवे येथे राहयला होता. तो नामांकित जीम ट्रेनर म्हणून ओळखला जात होता. गेल्या काही वर्षापासून तो मुंबई येथे जीम ट्रेनर म्हणून काम करीत होता. मुंबई मध्ये तो मोठमोठया मॉडेल आणि बॉलिवूड सेलीब्रेटीजचा जीम ट्रेनर म्हणून काम करीत असल्याने त्याला आपण खूप मोठे आणि चिकणे आहोत असे वाटत होते. आपल्या सौदर्यांवर आणि देखणेपणावर अनेक मुली सेलीब्रेटीज फिदा आहेत आणि आपण एक हिरोच आहोत असे तो स्वत:ला मानत होता. त्यातूनच त्याची हिरोगीरी चालत होती. तो मुंबई येथे जीम ट्रेनर म्हणून काम करीत असताना त्याने एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला होता. त्या मुलीने ...पान २ वर

## दारू पिऊन तिला सतवायचा फार याराला केले अखेर प्रेयसीनेच ठार

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



मयत संजय

दारुड्या माणसाचा जवळच्यांना जास्त त्रास होऊ लागला कि मग कुणी नात्यागोत्याचा विचार करीत नाही. सोलापूरच्या आनंद नगरमध्ये राहणाऱ्या संजय भुताळी आणि भाग्यश्री यांचे अनैतिक संबंध होते आणि संजय तिला नेहमी दारू पिऊन त्रास देत असे. त्यामुळे वैतागून भाग्यश्रीने त्याची हत्या केली. या प्रकरणी भाग्यश्रीला अटक करण्यात आली असून तिची चौकशी सुरू आहे.

वडकबाळ येथील नाईकनगर तांडयाजवळ एका तरुणाचा अनैतिक संबंधातून गळा आवळून व लाकडाने मारून खून केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द मंद्रुप पोलीस ठाण्यात बुधवारी रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय भुताळी पुजारी (वय ३९) राहणार नाईकनगर तांडा, वडकबाळ (ता. दक्षिण सोलापूर) खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंद्रुप पोलीस कडून मिळालेली माहिती अशी की, संजय पुजारी हा नाईकनगर येथील पत्र्याच्या शेडमध्ये राहत होता. आज बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास पत्राशेडच्या जवळ पुजारी हा पडल्याची माहिती पोलीस पाटील अशोक पुजारी यांच्याकडून मंद्रूप पोलिसांना मिळाली. त्यानंतर तातडीने सहाय्यक पोलीस निरीक्षक ...पान २ वर

## दोन बायका असताना तिसरीच्या फंदात पडला लग्नाचा तगादा लावताच तिचा काटा काढला

नाशिक (इगतपुरी)/क्राईम रिपोर्टर



मयत लक्ष्मी

माणसाला किती जरी महिलांचा सहवास लाभला तरी त्याची तहान भागत नाही. कारण त्याला नवी नवी शिकार हवी असते. इगतपुरी तालुक्यातील आधारवड गावात शरद वाघ नावाचा असाच एक लंपट शेतमजूर होता. त्याला दोन बायका होत्या आणि विशेष म्हणजे त्या सख्ख्या बहिणी होत्या. तरीही शरदची नजर त्या दोन बायकांच्या तिसऱ्या बहिणीवर म्हणजेच मेव्हणीवर पडली आणि त्यांचे अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र तिने लग्नाचा तगादा लावताच त्याने नकार दिला याचा मेव्हणीला इतका राग आला कि तिने त्याच्या घराला आग लावली. त्यामुळे चिडलेल्या शरदने मेव्हणीवर कोयत्याने वार करून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात आधारवड नावाचे गाव आहे. या गावातील ताराची वाडीमध्ये शरद महादू वाघ आणि त्याचे कुटुंब रहाते. शरद हा ऊसतोड कामगार आहे. त्याला दोन बायका असून त्या सख्ख्या बहीणी आहेत. मीना आणि सावित्री अशी या दोघींची नावे आहेत. दोन सख्ख्या बहीणी आता सवती होऊन एकत्र नांदत होत्या. या दोघींना आणखी एक बहीण असून तिचे नाव लक्ष्मी संजय पवार असे आहे. लक्ष्मी ही २० वर्षाची तरूणी आहे. जवानीच्या जोशात असलेली लक्ष्मी आपल्या या दोन बहीणींकडे म्हणजेच शरद याच्या घरी रहाण्यासाठी आली होती. शरद ऊसतोड कामगार असल्यामुळे ती त्याच्याबरोबर ऊसतोडणीच्या कामाला जात असे. घरात दोन तरूण बायका होत्या, दोघींपासूनही शरदला सुख मिळत होते, पण तरीही त्याच्या मनात मेव्हणीबद्दल आकर्षण निर्माण झाले. या कोवळ्या पोरीला भोगण्याची स्वप्न तो पाहू लागला. आधीच एका मेव्हणीला त्याने बायको बनवले होते. आता ही दुसरी मेव्हणी भोगण्याची इच्छा त्याला झाली होती. कामाला एकत्र गेल्याने शरद आणि लक्ष्मीमध्ये जवळीक निर्माण झाली. तो तिच्या ...पान २ वर

## गरीब अल्पवयीन मुलगी आयुष्यातून उठली दोन गावगुंडांनी तिची जबरदस्तीने अब्रू लुटली

नाशिक/क्राईम रिपोर्टर



एसपी सचिन पाटील

महिलांच्या सुरक्षेबाबत सरकारने किती जरी मोठे मोठे दावे केले तरी महाराष्ट्रात आजकाल महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत आणि ग्रामीण भागात तर गावगुंडांची नजर एखाद्या मुलीवर किंवा विवाहित महिलेवर पडली तर तिच्या अब्रूवर दरोडा घातल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत. नाशिक जिल्ह्यातील खेरवाडी गावात अशाच दोन गावगुंडांनी शेतमजुराच्या तेरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीला चाकूचा धाक दाखवून तिच्यावर पाशवी बलात्कार केला. मात्र मुलगी घाबरलेली असल्याने तिने याबद्दल पालकांना काही सांगितले नाही. मात्र ती गर्भवती राहिल्यावर या दुष्कृत्याला वाचा फुटली आणि मुलीच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींना तात्काळ केली.

निफाड तालुक्यातील खेरवाडी गावात भयानक घटना घडली. सायंकाळच्या सुमारास घरात कोणी नसल्याचे पाहून दोघा नराधमांनी बळजबरीने घरात घुसून एकटी असलेल्या १३ वर्षे ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर आळीपाळीने बलात्कार केला. या अत्याचाराने ही पिडीत मुलगी मूग गिळून बसली होती, मात्र निसर्ग थोडाच थांबणार होता. त्याने आपली प्रक्रिया पूर्ण केली आणि ही ...पान ६ वर

## बायकोच्या चिथावणीने नातवाचे डोके फिरले अतिरागाच्या भरात त्याने आजीलाच ठार मारले



मयत रजिया

सोलापूर/क्राईम रिपोर्टर



आजकाल रक्ताची नाती सुद्धा इतकी कमकुवत झालीत कि शुल्लक कारणही अशी नाती तुटायला पुरेशी असतात आणि मुलांची लग्न झाली कि मग घरातील आई-वडील किंवा आजी-आजोबा यांचा त्यांना अडसर वाटायला लागतो. अशावेळी एकतर त्यांना वृद्धाश्रमात पाठवले जाते किंवा कृतघ्न मुलांकडून त्यांना कायमचा वरचा रस्ता दाखवला जातो. सोलापुरातील अशाच एका घटनेत एका नातवाने आजी त्याच्या पत्नी सोबत भांडत असते म्हणून बायकोच्या चिथावणीवरून आजीचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी नातवाला अटक केली आहे.



आरोपी शहानवाज



रजिया सलीम शेख (वय ७२) या विडी घरकुल कुंभारी येथे नातु शहानवाज मेहबुब शेख व त्याची पत्नी व त्याच्या मुलासोबत राहयला आहेत. या वयात ही त्या आजही जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील एका इमारतीत बॉन्ड रायटर म्हणून काम करीत असतात त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत होता. त्याच्या दोन्ही मुलीची लग्ने झाली असून त्या ही विडी घरकुल परिसरातच राहयला आहेत. रजिया शेख या पार्किग शेजारील इमारतीत बॉन्ड रायटर म्हणून काम करीत होत्या. त्याच्या शेजारील कॅन्टीनमध्येच त्याचा नातु शहानवाज शेख हा काम करीत होता. दररोज सकाळी त्या पहाटे ५ वाजणेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालया परिसरातील दर्गात जात होत्या. तेथून परत आल्या की त्या आपल्या कामाच्या ठिकाणी येवून झाडलोट करून आपल्या कामाला लागत ...पान ६ वर

## प्रेमाच्या त्रिकोणात एक फूल दो माली प्रेयसीसाठी मित्राने मित्राची हत्या केली



कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

ज्या प्रमाणे एका म्यॅनात दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे कितीही प्रेम असले तरी एक तरुणी दोघांसोबत राहू शकत नाही. अशावेळी आपल्या प्रेयसीवर आपलच मित्र लाईन मारतोय, तिच्यावर एकतर्फी प्रेमातून तिला त्रास देतोय हे कुणीही सहन करू शकत नाही. कोल्हापुरातील दोन मित्रांच्या एक फूल दो माली प्रकरणात असेच झाले. एका मित्राच्या प्रेयसीवर त्याचाच मित्र जाळे टाकण्याचा प्रयत्न करीत होता. यावेळी मित्राने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, पण तो ऐकला नाही. अखेर त्याच्याच मित्राने त्याला दारूच्या पार्टीत बोलावून त्याची हत्या केली.

कोल्हापूरातील साळाखे नगर येथे संकेत पाटील हा आपला चुलता दिलीप पाटील याचेकडे राहयला आहे. तो मुळचा कागल तालुक्यातील बस्तवडे येथील होता. शिक्षणाच्या निमित्याने तो कोल्हापूरला आपल्या चुलत्याकडे आला होता. त्याचे बारावी पर्यत शिक्षण झाल्याने तो येथेच मेकॅनिकलचे काम करीत होता. तसा तो येथे बऱ्याच वर्षापासून राहत असल्याने त्याची ...पान २ वर

04 TO 10 JULY 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 02/07/2022 8:23 PM Page 1



पान १ वरून....

## कौटुंबिक वादातून भलतेच घडले...

कपाऊंडमध्ये राहणाऱ्या सतीश जावळे या मुलाशी दिपालीचा विवाह निश्चित करण्यात आला. आई-वडिलांनी पै-पै जमवली. पुंजी पणाला लावून मुलीचे लग्न थाटात लावून दिले. समाजात ताठ मानेने जगता यावे म्हणून तिच्या आई-वडिलांनी मुलीच्या लग्नात कसलीच कसर बाकी ठेवली नव्हती. जमवलेली पुंजी पणाला लावून तिच्या आई-वडिलांनी मुलीचे कन्यादान केले आणि तिचा निरोप घेतला. सासरी आलेली दिपाली सुखात होती. पतीपत्नीचे विचार सुरुवातीला चांगले जमत होते. दोघेही खुल्या मनाने चर्चा करत होते. दोघांचाही संसार सुखाने चालला होता. त्यांच्या संसार वेलीवर फुल देखील उमली होती. घरातील कामे करून ती पतीच्या संसाराला हातभार लावत होती. भांड्याला भांडे लागते. त्याप्रमाणे नवरा बायकोची भांडणे होत राहतात. दिपाली आणि सतीशचे देखील असेच भांडण होत असे. पण त्यांचे भांडण इतके टोकाला जाईल असे कधी वाटलं नव्हतं. तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. त्यातून दोघात तू तू मै मै होऊ लागले. याच रागातून दिपाली घर सोडून निघून गेली. त्यामुळे त्याला राग आला. या रागातून १९ जून रोजी दिपाली सतीश जावळे (वय ३७) हि तनिष्क ज्वेलर्स व भारती सलुन यांच्या मधल्या जागेत, फुटपाथवर, एमजी रोड, घाटकोपर पूर्व येथून जात असताना पती सतीश जावळे (वय ४०) याने तिच्या चारित्र्याच्या संशयावरुन त्याचा मित्र स्वप्निल यशवंत पवार याचे सोबत येऊन सतीश जावळे याने दिपाली हिच्या गळ्यावर व पोटावर चाकूने वार करुन गंभीर जखमी केले. जखमी अवस्थेत तिला राजावाडी रुग्णालय येथे उपचार कमी दाखल केले असता डॉक्टरनी जखमी महिलेस मयत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी तिची आई नंदा चंद्रकांत भिंगारे (वय ६०) रा. रूम नं १०, ओएनजीसी कॉलनी जवळ, शास्त्री नगर, विदयाविहार यांच्या फिर्यादी वरून सतीश जावळे व त्याचा मित्र स्वप्निल पवार यांच्या विरुद्ध गु. र. क्र. ४१६/२२, कलम ३०२, ३४ भादवि सह ३७ (१) (अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पोलिसांनी या दोघांना अटक केली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील काळे यांनी दिली.

## एकतर्फी प्रेम अखेर जीवघेणे ठरले...

त्याचे विरोधात त्यावेळी पोलीसात तक्रार दाखल करून त्याच्या विरोधात कोर्टात केस दाखल केली होती. त्या केसमध्ये तो जेलमध्ये असताना त्याला जामीन मिळाला होता. जामीन मिळाल्याने तो बाहेर आल्यावर त्याने मुंबई सोडून तो सरळ गोव्याला आला होता. तसे त्याला गोवे काही नवीन नव्हते. तो मुळचा सावंतवाडी येथील असल्याने त्याचे गोव्यातील काही मित्राशी जवळचे संबंध होते. त्यातूनच तो मुंबई सोडून गोव्याला त्याने आपले बस्तान बसविले होते. गोव्यात तो जुने गोवे येथे राहयला आला.त्यातूनच त्याची ओळख ही त्याचे शेजारीच राहत असणाऱ्या डॉ.गौरी आचारी हिच्याबरोबर झाली. ती ही आपली आई भारती आचारी हिच्यासोबत राहत होती. ती खांडोळा सरकारी महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून सेवा बजावित होती. गौरव हा जीम ट्रेनर म्हणून काम करीत असल्याचे तिला माहित होते. त्याने तिला आपली ओळख करून देताना आपण एक प्रशिक्षीत जीम ट्रेनर आहोत तसेच मुंबई येथे जीम ट्रेनर म्हणून काम करीत असताना आपण बीसीसीआय व एटीएसला स्ट्रेथं ॲन्ड कंडिशनिंगचे प्रशिक्षण दिले असल्याचे सांगितले. आपण अनेक करोडपती व सिने स्टार यांना ही जीमचे ट्रेनिंग दिले असून आपल्याला अनेक सेलीब्रेटीज चांगले नावाने ओळखतात असे सांगून तिचे मन जिंकण्याचा प्रयत्न केला. तो मनोमन तिच्यावर मनापासून प्रेम करीत असल्याने सारखा या ना त्या कारणाने तो तिच्याशी जवळीक साधत होता. तो जवळीक साधत असताना ती मात्र आपल्या मनात कोणताही आडपडदा न ठेवता त्याच्याशी बिनधास्तपणे बोलत होती. याचा अर्थ त्याने वेगळाचा काढला होता. तो तिला बाहेर कुठे ही आपल्या कारमधून फिरायला नेत होता. तो फक्त आपला चांगला मित्र आहे एवढेच ती मानत होती.तिच्या मनात त्याच्या विषयी काहीच नव्हते. तिला आपले करियर महत्वाचे होते. नुकतेच तिने पीएचडी केल्याने तिला मायक्रोबायोलॉजिमध्ये स्कॉलर म्हणून पुढे संशोधन करायचे होते. त्यासाठी ती डॉक्टोरल रिसर्च म्हणून पुढील काही दिवसात ऑस्ट्रेलियाला जाणार होती. तशी तिची तयारी ही चालली होती. मायक्रोबॉयोलॉजिमध्ये तिचे प्राविण्य असल्याने गोव्यातील वैद्यकीय क्षेत्रात ही तिची चांगली ओळख होती. विद्यार्थ्यांमध्ये ही ती चांगली प्राध्यापिका म्हणून ओळखली जात होती. एक हुशार, होतकरू आणि नवीन पिढी घडविणारी ती प्राध्यापिका होती. तिच्या आयुष्यात एकाकीच गौरव बिंद्रे आला होता. ती त्याचेबरोबर बोलत फिरत असल्याने त्याला तिचे आपल्यावर प्रेम आहे असे वाटत होते. तसे त्याने तिला प्रपोज करताना सांगितले होते. पण तिच्या मनात त्याच्या विषयी काहीच नसल्याने तिने त्याचे प्रपोज धुडकावून आपल्याला प्रेम वगैरे कशात इंटरेस्ट नसल्याचे सांगून त्याला टाळले होते. खरे तर त्याचे तिच्यावर एकतर्फी प्रेम होते. तो वनवे चालला होता.आपण इतके देखणे आणि हिरोसारखे असून गौरीने आपल्याला नकार दयावा हे त्याला पटत नव्हते. कसे ही करून तिला आपल्या जाळ्यात अडकवायचे याचा तो विचार करीत असताना तो सारखा तिच्या घराकडे तिला भेटायला जात होता.एकदा दोनदा तिने त्याला नकार ही दिला होता. पण तो तिला जास्तच गळ घालून बाहेर फिरायला नेत होता. हल्ली तिला त्याचेबाबत कुणाकडून तरी काही तरी समजले होते. तसे तिने त्याला बोलते करण्याचा प्रयत्न केला पण तो काही तिला त्याबाबत सांगायला तयार नव्हता. मग तिनेच त्याचे वर्मावर बोट ठेवीत तू मुंबईत असताना एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला आहेत आणि त्या गुन्हयात तु जामीनवर बाहेर आहेस त्यामुळे मला तुझ्या सारख्या चारित्र्यहीन गुन्हेगाराशी संबंध ठेवायचे नाहीत असे स्पष्टच सांगितले आणि आपल्या पासून दूर राह असे सांगून परत आपल्याला भेटू नकोस आणि आपल्या घरी ही येवू नकोस असे सांगून त्याला टाळले होते. त्यावेळेपासून ती त्याला भेटत ही नव्हती आणि बोलत ही नव्हती. ती आपल्याशी पटकून वागते बोलत नाही आपल्या प्रेमाचा स्विकार करीत नाही याची खंत गौरव याच्या मनाला बोचत होती.तो तिला सारखे फोन करून भेटायला बोलवित होता.पण ती मात्र त्याचा फोन ही घेत नव्हती. त्याने तिचा नंबर ही ब्लॅकलिस्टला टाकला होता. आता तो तिच्यावर चिडून होता.काही करून गौरीला मानवायचे नाही तर तिचे काही तरी बरेवाईट करायचे या विचारात तो होता.ती कॉलेजला किती वाजता जाते याची माहिती त्याला होती. म्हणून तो तिच्यावर नजर ठेवून होता. गुरूवार दि.२३ जून रोजी सकाळी ती नेहमीप्रमाणे कॉलेजला गेली होती. पण संध्याकाळ झाली तरी ती घरी परत आली नाही म्हणून तिची आई भारती आचारी हिने ती घरी का आली नाही म्हणून तिची चौकशी कॉलेजमध्ये केली असता ती दुपारीच कॉलेजमधून बाहेर पडली असल्याचे तिला सांगण्यात आले.रात्री उशिरा ती घरी परत आली नाही म्हणून तिच्या आईने जुने गोवे पोलीसात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करून तिचे अपहरण गौरव बिंद्रे या जीम ट्रेनरने केले असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली. कारण त्याना ही गौरव हा मुलगी गौरी हिला त्रास देत असल्याचे माहित होते.भारती आचारी यांनी तक्रार दाखल केल्याने पोलीस बेपत्ता डॉ.गौरी आचारी हिचा शोध घेत असताना शुक्रवार दि.२४ जून २०२२ रोजी पणजी -जुने गोवे रस्त्यावरील कदंब पठाराजवळील झाडाझुडपात एका महिलेचा मृतदेह पडला असल्याची माहिती जुने गोवे पोलीसांना मिळाली. पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेवून पाहणी केली असता तो मृतदेह बेपत्ता डॉ.गौरी आचारी हिचा असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यांनी या घटनेची माहिती मयत गौरी आचारी हिची आई भारती आचारी यांना दाखविला असता त्यांनी तो मृतदेह आपली मुलगी डॉ.गौरी हिचा असल्याचे ओळखले. तिचा गळा कशाने तरी आवळ्याच्या खुणा दिसत होत्या. पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मयत डॉ.गौरी हिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गोमॅको इस्पितळात पाठवून या घटनेचा तपास सुरू केला. जीम ट्रेनर गौरव बिंद्रे हा मयत डॉ.गौरी आचारी हिच्यावर एकतर्फी प्रेम करीत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. यातून तो गौरीला त्रास देत होता, याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर संशयावरून पोलीसांनी गौरव याचा शोध घेवून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे मयत गौरी आचारी हिच्याविषयी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखवून बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. घटनेच्या दिवशी म्हणजे गुरूवार दि.२३ रोजी त्याने गौरीला फोन केला. ती त्याला भेटायला तयार नव्हती पण त्याने तिला शेवटचेच आपण भेटूया असे सांगून ती कॉलेजमधून परत येत असताना तिला ती राहत असलेल्या खोर्ली जुने गोवे येथील घराजवळ गाठले.तिला आपल्या कारमध्ये जबरदस्तीने बसवून जुने गोवे मार्गावरील कदंब पठाराजवळ आणले.कारमध्ये तो तिच्याशी वाद घालीत भांडत होता.ती ही त्याला जशास तसे उत्तर देत होती.मला तुझ्यात इंटरेस्ट नाही असे तिने त्याला सांगताच त्याला राग आला. रागाच्या भरात त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला.ती त्याचे तावडीतून निसटण्याचा प्रयत्न करीत होती. पण तिला त्यात यश आले नाही. त्याने आपल्या ताकतीने जोरात तिचा गळा दाबला असता काही क्षणात ती निपचीप आणि गार झाली. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात आल्यावर तो भांबावला. काही वेळ विचार करून त्याने तशीच कार पठारजवळील निर्जन स्थळी आणून तेथील झाडाझुडपात तिचा मृतदेह टाकून तेथून तो पसार झाला. या घटनेची फिर्याद मयत डॉ.गौरी आचारी हिच्या आईने दिल्याने जुने गोवे पोलीसांनी भारती आचारी यांच्या फिर्यादीवरून डॉ.गौरी आचारी (वय ३७) याचा गळा दाबून खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी गौरव बिंद्रे (वय ३६) याच्या विरोधात जुने गोवे पोलीसात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला शनिवार दि.२५ रोजी मा.न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला १० दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली कार जप्त केली.या घटनेचा तपास उत्तर गोव्याचे पोलीस अधिक्षक शोबित सक्सेना पोलीस उपाधिक्षक सुरेश नाईक याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश गडेकर याच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक सुदीन रेडकर, गौरेश मळीक, विराज धावस्कर याच्या टीमने केला. खरे तर या जगात प्रेमासारखी सुंदर अशी कोणतीच गोष्ट नाही.परंतु बऱ्याच जणांचा मार्ग हा एकतर्फी प्रेमातून जात असतो. आणि त्यातूनच अशा घटना घडत असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारू पिऊन तिला सतवायचा...

डॉ. नितीन थेटे, पीएसआय सय्यद व इतर घटनास्थळी दाखल झाले. मयत पुजारी यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून लाकडी फळीने कपाळावर व उजव्या कानावर मारून गंभीर जखमी केले होते. तसेच त्याच्या गळ्याभोवती पांढऱ्या रंगाच्या सुती दोरीने गळा आवळून जिवे ठार मारल्याचे आढळून आले. त्यानंतर पंचनामा करून मृतदेह मंद्रुप ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून गुरूवारी अंत्यसंस्कार करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपास सुरू केला. याच गावातील काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी कन्नाप्पा भुताळी पुजारी पुजारीवस्ती वडकबाळ यांनी फिर्याद आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त पीएसआय अमितकुमार करपे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास केला?असता भाग्यश्री महादेव भोई (वय ३५) वर्षे रा. वाडकबाल तांडा हिने आज रोजी गुन्ह्याची कबुली दिल्याने तिला अटक करण्यात आली आहे. यातील आरोपीचे मयत पुजारीसोबत १० वर्षांपासून अनैतिक संबंध होते. दरम्यान त्यांचे सारखा वाद होऊ लागल्याने ती आठ महिन्यांपासून वेगळी राहत होती. मात्र पुजारी तिला दारू पिऊन तिचे घरी जाऊन त्रास देत असल्याने त्या त्रासास कंटाळून संजय भुताळी पुजारी यास ठार मारल्याचे सांगितले.

## दोन बायका असताना तिसरीच्या...

मागे-पुढे फिरु लागला. तिच्याशी जवळीक साधू लागला. तिच्या शरीराला स्पर्श करू लागला. तिलाही शरद आवडू लागला. आपल्या दोन बहीणींना सुखी ठेवणारा हा पुरुष आपल्यालाही प्रेम देण्यास समर्थ असेल असे तिला वाटू लागले. ती आकर्षित झाल्याने त्याला प्रतिसाद देऊ लागली. तसा तो चेकाळला. संधी साधून त्याने तिला एका आडोशाला नेले आणि तिच्याकडून शरीरसुख घेतले. त्याच्या त्या समागमाने ती हरखून गेली. दोन बायका असतांना शरदने लक्ष्मीबरोबर अनैतिक संबंध प्रस्थापित केले. हे करतांना त्याला सुख मिळाले. पण पुढे काय होणार याची त्याला जाणीव नव्हती. तो आता तिला कधीही भोगू लागला. तिलाही त्याच्याशी संबंध ठेवणे आवडत होते. पण आता तिला मेव्हणी म्हणून नाही तर बायको म्हणून त्याच्याकडून सुख घ्यावे वाटू लागले. त्यामुळे आता ती आपल्या भाऊजीला माझ्याबरोबर लग्न कर असे म्हणू लागली. आधीच दोन बायका, त्यांची मुले, त्यामुळे त्याचा कुटुंबकबिला मोठा होता. त्यात कमावणारा तो एकटाच असल्याने त्याला नेहमी आर्थिक कसरत करावी लागत होती. आता ही लग्न कर म्हणू लागल्याने शरद बिथरला. मनसोक्त भोगतांना आनंद देणारी मेव्हणी आता त्याला ब्याद वाटू लागली. ती त्याच्याकडे लग्नाचा तगादा लावू लागल्याने त्रासदायक वाटू लागली. त्याने लग्न करण्यास तिला नकार दिला. आपला दाजी नकार देत असल्याचे पाहून लक्ष्मीला राग आला. ती त्याच्याशी वाद घालू लागली. या दोघांमध्ये सतत भानगडी होवू लागल्या. तो लग्नास नकार देत असल्याने लक्ष्मी भयानक संतापली. तो ऐकत नाही म्हटल्यावर तिने त्याच्याबरोबर भांडण काढले आणि म्हणाली, तु जर माझ्याशी लग्न करत नाहीस तर मी तुझे घर जाळीन. तिने थेट घर जाळण्याची धमकीच दिली असली तरी ती तसे करणार नाही असे त्याला वाटत होते. शनिवार दि. १९ जून २०२२ रोजी पहाटे ४ ते ४.३० वाजण्याच्या दरम्यान शरद व लक्ष्मी वा दोघांमध्ये कडाक्याचे भांडण सुरू झाले. तिने त्याला पुन्हा एकदा लग्नाबाबत विचारले, तेव्हा शरदने तिला नकार दिला. त्याचा अजूनही नकार आहे. हे पाहिल्यावर तिने खरोखरच त्याची झोपडी जाळण्याचे ठरवले. ती जागची उठली आणि तिने शरदच्या झापडीला आग लावून दिली. क्षणार्धात झोपडीने पेट घेतला. एका पाठोपाठ तीन झोपड्यांना आग लागली. शरद बरोबर शंकर ज्ञानेश्वर वाघ व अलका संजय वाघ अशा तिघांची घरे जळून खाक झाली. आग विझवायला पाणी नव्हते. त्यामुळे झोपडीमधील अन्नधान्य, वस्तू, कपडे आदी संसारोपयोगी सामान जळून खाक झाले. आपल्या मेव्हणीने खरोखरच झोपड्यांना आग लावली. त्यामध्ये आपले संसारोपयोगी सामान जळून खाक झाले. तिने आर्थिक नुकसान केल्याचा राग शंकरला आला. इकडे सगळे लोक आग विझवण्यात मग्न असतांना शरदने मेहुणीला गाठले आणि तिच्या मानेवर पूर्ण ताकदीनिशी ऊस तोडणीचा कोयता मारला. त्या एकाच घावात ती रक्तबंबाळ होवून खाली पडली. थोडा वेळ तडफडून ती शांत झाल्याचे दिसताच शरदने घोटी पोलीस स्टेशन गाठले. जमिनीच्या वादातून १० ते २० जणांनी आपल्या घरांवर हल्ला करून आमची तीन घरे जाळली. त्यातच माझी मेहुणी लक्ष्मी पवार हिचा खून केला अशी फिर्याद त्याने पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक खेडकर व त्यांचे सहकारी घटनास्थळी गेले. त्यांनी घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा केला. याच दरम्यान घोटी पोलीस ठाण्यामध्ये शंकर ज्ञानेश्वर वाघ (वय २५) यांनी आपल्या झोपड्या लक्ष्मी संजय पवार हिने जाळल्याची फिर्याद दिली होती. गुन्हा रजि. नं. १८/२०२२ ला भा.दं.वि. कलम ४३६ नुसार हा गुन्हा नोंद झाला होता. शंकर वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीत लक्ष्मी पवारने ही आग लावल्याचे म्हटले होते, तर शरद वाघ सांगत असलेल्या कहाणीमध्ये लक्ष्मीचा जमावाच्या हल्लयात खून झाला असा उल्लेख होता. या दोन्ही वेगवेगळ्या फिर्यादीमध्येच शरदचा बनाव पोलिसांच्या लक्षात आला. पोलिसांनी शरद वाघ याला ताब्यात घेतले आणि त्याच्याकडे विचारपूस करुन त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार करण्यात आला. तो अजूनही दिशाभूल करणारी माहित देत होता, पण पोलिसांच्या एका प्रश्नापुढे तो गडबडला. घटनास्थळी चौकशी करण्यात आली, तेव्हा त्यांना शरद वआघ जे काही सांगत आहे. त्यामध्ये तो काहीतरी लपवत आहे अशी शंका आली. पोलिसांनी त्याला विचारले, एवढी घटना घडूनही तुझे कपड़े, खिशातील पैसे, सर्व काही जसेच्या तसे का राहिले? हे उत्तर त्याला देता आले नाही. शेवटी त्याला आपला गुन्हा कबुल करावाच लागला. स्वतः शरद घोटी पोलीस ठाण्यात खोटी फिर्याद देण्यास दाखल झाला होता. मात्र तोच आरोपी निघाल्याने घोटी पोलीस ठाण्यामध्ये लक्ष्मी पवार हिच्या खून प्रकरणी तिची बहीण म्हणजेच शरदची पत्नी सावित्री शरद वाघ हिने फिर्याद दिली. गुन्हा रजि. नं. १७/२०२२ मा. दं. वि. ३०२ कलमाखाली लक्ष्मी पवार हिचा खून केल्याचा गुन्हा शरद वाघ यांच्यावर दाखल करून त्याला गजाआड केले.

## प्रेमाच्या त्रिकोणात एक फूल ...

अनेकांशी मैत्री होती. साळोखेनगर परिसरातील रोहित कांबळे, शिवराज बंडगर, प्रतिक कांबळे याच्याबरोबर खास मैत्री ही होती. तो त्याचेबरोबर जेवायला प्यायला जात होता. ते चौघे जवळचे मित्र असल्याने एकमेकांच्या अंतर्गत गोष्टी त्यांना माहित होत्या. रोहित कांबळे याचे साळोखेनगर परिसरातील एका युवतीबरोबर प्रेम संबंध होते.ती युवती ही त्याचेवर मनापासून प्रेम करीत होती. ते दोघे ही बाहेर भेटत होते, तसे बोलत होते त्याचे प्रेम बहरत होते फुलत होते. ही गोष्ट रोहितच्या जवळच्या मित्रांना माहित होती. तशी ती गोष्ट संकेत पाटील याला ही माहित होती. तरी ही तो रोहितच्या प्रियेसीच्या मागे लागत होता.त्याला ही ती हवी होती.त्या युवतीला तो रोहितचा मित्र आहे एवढेच माहित होते. संकेत हा ती युवती कुठे बाहेर गेली, कॉलेजला गेली की तिच्या मागे मागे जात होता.तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या ही मनात ती युवती बसली होती. पण एवढे सगळे करून ही ती युवती त्याला लाईन देत नव्हती.तरीही तो तिच्या मागे मागे लागत होता. तिला आपलेसे करण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न करीत होता. इकडे त्या युवतीने संकेत हा आपल्या मागे लागत आहे तो आपल्याला त्रास देत आहे त्याला ताकीद कर असे प्रियकर रोहित कांबळे याला सांगितले होते. मी तुझी आहे माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि तुझा मित्र माझ्या मागे लागत आहे मला रस्त्यात आडवून त्रास देत आहे हे तिने सांगितल्यावर रोहितचे टाळकेच सटकले होते. तसे त्याने ही गोष्ट आपले मित्र शिवराज बंडगर आणि प्रतिक कांबळे यांना सांगून संकेत पाटील हा कसा आपल्या प्रियेसीला त्रास देत आहे याची कल्पना दिली होती. त्यामुळे ते तिघे ही आता संकेतवर चिडून होते.रोहित आणि संकेत याच्याबाबत तर त्या युवतीवरून एक फुल दो माली अशी गत झाली होती. संकेत हा तिच्यावर मनापासून प्रेम करीत होता तर ती युवती रोहितवर प्रेम करीत होती.रोहितने ही याबाबत संकेत याला समजावून सांगून माझ्या प्रियेसीपासून चार हात लांब राह तिला त्राद देवू नकोस असे सांगितले होते.पण तो काही त्याचे ऐकत नव्हता. त्याला ती युवती आपल्यावरच प्रेम करीत आहे असे वाटत होते. काही करून त्याला ती युवती पटवायची होती.तारूण्य सुलभ भावनेने तो तिच्या मागे मागे लागत होता. तिला प्रपोज करण्यासाठी सारखा धडपडत होता. पण ती मात्र त्याला घास घालायला तयार नव्हती.उलट तिने रोहितकडे संकेतची तक्रार करून त्याला समजावून सांग असे सांगितले होते. त्यामुळे रोहितचे मित्र प्रतिक कांबळे आणि शिवराज बंडगर यांनी ही संकेतला पार्टीला बोलावून रोहितच्या प्रियेसीपासून लांब राह तिला विनाकारण त्रास देवू नकोस असे सांगितल्यावर त्याने ही दारूच्या नशेत तुम्ही मला कोण सांगणार ती माझी नटी आहे उलट रोहितनेच तिच्यापासून लांब राहवे असे सांगितले त्यावेळी ते चौघे ही दारुच्या नशेत असल्याने त्या युवतीवरून संकेत आणि रोहित याचेमध्ये बाचाबाची झाली. उगाच वाद नको म्हणून त्यावेळी शिवराज बंडगर आणि प्रतिक कांबळे यांनी त्या दोघाना सोडवून बाजुला केले. दारुच्या नशेत तो रोहितला शिव्या देत होता.याचा राग रोहितसह त्या दोघांना ही आला होता. आपल्या प्रेमप्रकरणात संकेत हा अडसर ठरतो आहे माझे त्या युवतीवर प्रेम असताना तो आपल्यालाच बाजुला हो म्हणून सांगतो आहे याचा रोहितला राग आला त्याने त्याला बघून घेण्याची भाषा केली होती. त्यावेळेपासून ते दोघे बोलत नव्हते.इकडे मात्र रोहित आणि त्याची प्रियेसी याचेत गुप्तगु चालू होते. त्याचे प्रेम बहरत होते. फुलत होते. त्या दोघांनी ही लग्न करण्याचे ठरविले होते. तसे त्याच्या लग्नाला दोघांच्या ही घरातून विरोध होणार हे त्यांना ही माहित होते. पण घरच्या विरोधापेक्षा त्यांना संकेतचा धोका जास्त वाटत होता. तो सांगून ही ऐकत नव्हता. त्या युवतीवरून त्या दोघात खुन्नस चालू होती.दोघे ही मित्र होते पण त्या युवतीवरून त्याचेतील मैत्री तुटली होती. ते दोघे ही एकमेकांचे शत्रु बनले होते.दोघांच्यातून आता विस्तव ही जात नव्हता. ती माझीच आहे असे मत संकेतचे झाले होते. तर दुसरीकडे रोहितचे आणि तिचे प्रेमप्रकरण संपूर्ण साळोखेनगर वाल्मिकीनगर परिसराला माहित झाले होते. तरी ही संकेत तिचा पाठलाग सोडायला तयार नव्हता. म्हणून शिवराज बंडगर, प्रतिक कांबळे आणि रोहित कांबळे यांनी संकेतला कायमचा धडा शिकवायचा असे ठरविले होते. शनिवार दि.२५ रोजी संकेत हा संध्याकाळी कामावरून घरी परत आला. त्यावेळी त्याच्या चुलत्याची रात्र पाळी असल्याने ते कामावर निघून गेले. तर त्याची काकू ही गेल्या चार पाच दिवसापूर्वीच पंढरीच्या आषाढी वारीला गेली होती. त्यामुळे संकेत हा घरी एकटाच होता. त्यावेळी प्रतिक कांबळे याने संकेतला फोन करून तुझे व रोहितचे भांडण मिटवूया आणि मस्तपैकी पार्टी करूया तु संभाजी राजे येथील प्राथमिक शाळेच्या मागील बाजुस असणाऱ्यां मोकळ्या माळ रानात ये असे सांगितले. पार्टी करायची असल्याने संकेत ही घराला कुलूप लावून तिकडे गेला. तेथे अगोदरच शिवराज बंडगर प्रतिक कांबळे व रोहित कांबळे हे तिघेजण होते. त्यांनी दारूची आणि स्नॅकची सगळी व्यवस्था केली होती. संकेत तेथे आल्यावर त्यांनी त्याला घेवून पार्टी करायला बसले.ते सगळेजण दारू पित स्नॅक्स खात बसले होते. पेग वर पेग चढत होता. चौघांना ही बऱ्यापैकी नशा झालेली होती. दारूच्या नशेत असताना रोहितने परत आपल्या प्रियेसीचा विषय काढला. ती माझी आहे तू तिच्या नादाला लागू नकोस आम्ही दोघे ही लवकरच लग्न करणार आहोत तू तिला त्रास देवू नकोस असे म्हटल्यावर संकेतने ही त्याला तू जा रे ती माझी नटी आहे असे म्हणत त्या मोकळ्या रानात तिचे नाव घेवून आय लव्ह यू असे म्हटला. ते तिघे ही त्याचेवर जाम चिडले होते. दारूच्या नशेत असणाऱ्या संकेतला बाजुला ढकलून देत त्यांनी त्याला खाली पाडून मारहाण करायला सुरूवात केली.ते त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करीत असताना प्रतिक याने त्याला संपव रे तो सांगून ऐकत नाही असे म्हणत त्याला अर्वाच्च भाषेत शिवी घातली. त्यावेळी शिवराज बंडगर याने आपल्याकडील चाकू काढून संकेतच्या अंगावर पोटावर सपासप असे वार केले. तो ओरडत असताना त्याचे वार करणे चालूच होते या सगळ्यात रोहितने ही त्याचेवर परत चाकूने वार केले.तो रक्ताच्या थारोळ्यात तडपडत पडला.हे बघून मर साल्या, म्हणत त्यांनी त्याला परत मारायला सुरूवात केली.त्या मारहाणीत त्याचा जागीच मृत्यू झाला होता.आपण केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचे बघून त्या तिघांनी ही रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तेथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या भागातील लोकांना संभाजी राजे शाळेच्या पाठीमागील बाजूस असणाऱ्या माळरानात संकेत पाटील याचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडला असल्याचे दिसून आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती जुना राजवाडा पोलीस स्टेशनला दिली.ही माहिती मिळताच जुना राजवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस घटनास्थळी तातडीने दाखल झाले.घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे, उपाधिक्षक मंगेश चव्हाण यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली. जुना राजवाडा पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पोलीसांना दारूच्या बाटल्या, स्नॅक्स आणि चप्पल पडल्याचे दिसून आले. संकेत पाटील याच्या नातेवाईकांनी त्याचा मृतदेह ओळखला होता.मयताची ओळख पटल्यावर पोलीसांनी तपासाला सुरूवात केली. मयत संकेत पाटील याचे चुलते दिलीप पाटील याचेकडून माहिती घेतली असताना त्याना तुटक अशी माहिती मिळाली होती.मयत संकेत याचे मोबाईल पोलीसांनी चेक केले असता त्याचे मोबाईलवरती प्रतिक कांबळे आणि शिवराज बंडगर याचे फोन आल्याचे दिसून आले.पोलीसांनी त्याची माहिती घेतली असता ते घटनेनंतर पळून गेल्याचे समजले. त्याच्या मोबाईल कॉलच्या लोकेशनवरून पोलीसांनी त्याचा शोध घेतला असता काही तासातच ते पोलीसांना सापडले.पोलीसांनी त्यांना ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता तो आपल्या मित्राच्या प्रियेसीला त्रास देत असल्याने आपण त्याचा खून केल्याची कबुली त्यांनी पोलीसांना दिली. या घटनेत रोहित कांबळे याचा ही सहभाग असल्याने पोलीसांनी त्याला ही ताब्यात घेतले होते. या घटनेची लेखी फिर्याद मयत संकेत पाटील याचे चुलते दिलीप पाटील यांनी जुना राजवाडा पोलीसात दिल्याने पोलीसांनी संकेत सर्जेराव पाटील (वय १९) याच्या खून प्रकरणी शिवराज चंद्रकांत बंडगर (वय २२) प्रतिक विजय कांबळे (वय १९) रोहित नामदेव कांबळे (वय १९) सर्व रा.वाल्मिकी नगर साळोखे नगर कोल्हापूर याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना प्रथम वर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला.या घटनेचा तपास जुना राजवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.दत्तात्रय नाळे, उपनिरी.संदीप जाधव व एलसीबीच्या पथकाने करून संशयीत आरोपीना ताब्यात घेतले होते. प्रेम हे प्रेम असते जसे तुमचे आमचे सेम असते ही भावना जर समजावून घेतली तर ते प्रेम बहरत फुलत असते नाही तर ती माझीच नटी आहे म्हणून प्रेमात अडथळा निर्माण केला तर त्यातून अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## नराधमाला सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा

भिवंडी/प्रतिनिधी

एका ९ वर्षीय अल्पवयीन पीडितेला शीतपेय मधून गुंगीचे औषध पाजून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. त्यानंतर घडलेल्या प्रकार कुणाला सांगितल्यास पीडित मुलीला ठार मारण्याची देखील धमकी दिली होती. हि धक्कादायक घटना भिवंडी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. त्यावेळी नराधमावर अत्याचारासह पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून, भिवंडी शहर पोलिसांनी बेड्या ठोकले होते. आता सुमारे ७ वर्षांनी या नराधमाला अंतिम सुनावणी वेळी ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश (पोक्सो) व्ही.व्ही. वीरकर यांनी ६ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. गणेश ऊर्फ गण्या सदावर्ते असे शिक्षा सुनावलेल्या नराधम आरोपीचे नाव आहे. पीडित मुलगी भिवंडीत कुटूंबासह राहते.

# दागिने लंपास करणारा खुशबू ज्वेलर्सचा मालक नालासोपारा पोलिसांच्या जाळ्यात



**नालासोपारा/प्रतिनिधी**

ग्राहकांनी गहाण ठेवलेले दागिने अपहार करून पळून जाणाऱ्या नालासोपारा पश्चिम येथील खुशबू ज्वेलर्सच्या मालकाला मुद्देमालासह राजस्थानातून अटक करून नालासोपारा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. रामसिंग भवरसिंग कितावत असे आरोपीचे नाव आहे. त्यांच्याकडून ३६ तोळे २७२ मिलिग्राम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. मागील मार्च महिन्यात पुष्पा केवट यांनी खुशबू ज्वेलर्सचा मालक रामसिंग भवरसिंग कितावत यांच्याकडे ६२ ग्रॅम १९० मिलिग्राम वजनाचे २ लाख ७९ हजर रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने मोठ्या विश्वासाने गहाण ठेवले होते. मात्र १५ दिवसानंतर रामसिंग दुकान बंद करून पळून गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी नालासोपारा पोलीस ठाणे गाठून त्याबाबत तक्रार दिली. त्यानंतर इतर आणखी सोळा लोकांच्या सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करून पळून गेल्याचे निदर्शनास आल्याने खुशबू ज्वेलर्सचा मालक रामसिंग भवरसिंग कितावत यांच्याविरोधात गुन्हा रजि. नं. १२५/२०२२ भा. दं.वि.सं. कलम ४२०, ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोठ्या प्रमाणात झालेल्या फसवणुकीचे गांभीर्य लक्षात घेऊन नालासोपारा पोलिसांनी तपास सुरू केला होता.

पोलिसांना घटनास्थळावर मिळालेले पुरावे आणि तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्ह्याचा तपास केला असता आरोपी रामसिंग भवरसिंग कितावत हा राजस्थान येथे आपल्या मूळ गावी पळून गेल्याची माहिती मिळाली. त्यानंतर आरोपीला मु. वाडावावडी, जि. राजसमंद, राजस्थान येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. आरोपीकडे अधिक तपास केला असता त्याने फिर्यादी केवट फसवणूक केल्याची व इतर सोनाराकडे दागिने घाण ठेवल्याचे सांगितले. या गुन्ह्यातील अपहार झालेल्या दागिन्यांपैकी एकूण ३६ तोळे २७२ मिलिग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. आरोपीने आणखी दागिने अपहार करून फसवणूक केल्याची शक्यता असल्याने त्याचा तपास सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांनी दिली. परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत वाघुंडे, नालासोपारा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव, नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. पंडित म्हस्के, अमोल तळेकर, पो. आदिनाथ कदम, किशोर धनु, पोना. सचिन कांबळे, पोशि. सचिन मोहिते, राजेश नाटूलकर, पो. उपायुक्त कार्यालयातील पोना. ढोणे यांनी कामगिरी पार पाडली आहे.

# बीडीओच्या दालनात दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्या ग्रामसेवकावर गुन्हा दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**





अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांच्या दालनात दारू पिऊन गोंधळ घालणाच्या आरोपाखाली मल्लिनाथ सातप्पा जिडगे (४५) या ग्रामसेवकावर अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ३० जून रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडलेला आहे. याबाबत विस्तार अधिकारी शंकर गणपती घुगरे यांनी तक्रार नोंदवली आहे.

ग्रामसेवक मल्लिनाथ जिडगे हा गुरुवारी दुपारी मद्यप्राशन करून थेट बीडीओच्या कार्यालयात गेला, तो बीडीओबरोबर हुज्जत घालत होता. दरम्यान विस्तार अधिकारी भीमा तुळजापुरे, प्रकाश कोळी, दयानंद परिचारिक यांनी त्याला शांत करण्याचा भरपूर प्रयत्न केला. मात्र तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. दरम्यान बीडीओ खुडे यांनी तात्काळ उत्तर पोलीस ठाण्याच्या पोलिसांची संपर्क साधून त्यास ताब्यात दिले. पोलिसांनी मल्लिनाथ जिडगे यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्याची वैद्यकीय तपासणीसाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे रवानगी करण्यात आली. दरम्यान पोलिसांनी ग्रामसेवक मल्लिनाथ जिडगे यांची अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात तात्काळ वैद्यकीय तपासणी करण्यात आले. त्याच्या अहवालावरून जिडगेचे पुढील भवितव्य ठरणार आहे. जिडगे आजपर्यंतच्या सेवेत वादग्रस्त ठरला असून ज्या गावात त्यांनी सेवा बजावली आहे. तेथे त्यांनी गोंधळ घातल्याची चर्चा दिवसभर अक्कलकोट पंचायत समितीच्या आवारात चर्चा होती. त्याच्यावर काय कारवाई होणार आता अक्कलकोट पंचायत समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांची लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### शाळेचा विद्यार्थ्याचा गुणगौरव

वसई : तुळींज शिक्षण संस्थेच्या वतीने आज शाळेच्या वर्धापन दिनी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यामध्ये सोनी टीव्हीवर मराठी इंडियन आयडॉल या अजय-अतुल यांच्या कार्यक्रमात गायिका म्हणून नावाजलेली श्वेता दांडेकर हीला पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दामोदर पाटील, विश्वस्त दत्तात्रय देशमुख व शाळेच्या मुख्याध्यापिका या मान्यवरांच्या उपस्थितीत शालांत परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी श्वेता दांडेकर यांनी आपल्या सत्काराला उत्तर दिले.

### गुणवत्ता पुरस्काराचे धनादेश वाटप

पालघर : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्याने राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन सोहळा सहायक आयुक्त, समाज कल्याण, पालघर येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात इयत्ता दहावी व बारावी परिक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील मुला-मुलींना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार या योजनेखाली ८ विद्यार्थ्यांना धनादेश वाटप करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन समाज कल्याण निरीक्षक, व्ही. टी. हर्षा, यांनी केले.

### ४ जुलै रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येत. त्याअनुषंगाने या महिन्यातील जुलै २०२२ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ४ जुलै रोजी दुपारी १.०० वाजता . जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे. तरी अर्ज केलेल्या नागरिकांनी सदर बैठकीस आवश्यक त्या माहितीसह प्रत्यक्ष वरील दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

### वसई-विरारमध्ये पावसाची संततधार

वसई : गेले तीन दिवस वसई-विरारमध्ये पाऊस सुरु असून गुरुवारी व शुक्रवारी पावसाने जोर धरला. त्यामुळे नालासोपारा, आचोळे तसेच ग्रामीण भागात रस्त्यावर सखल भागात अनेक ठिकाणी पाणी साचले. नालासोपाऱ्यातील रस्ते एक ते दीड फूट पाण्याखाली गेले होते. त्यामुळे वाहतूक मंदावली होती. जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून या हंगामातील पाऊस पडू लागला आहे. मात्र हा पाऊस शेतीला लागणारा दमदार पाऊस नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. तसेच पावसाळा काहीसा लांबल्याने शेतीसाठी चिंताजनक परिस्थिती होती. मात्र गेल्या दोन दिवसातील पावसाने शेतकऱ्याला दिलासा मिळाला आहे. शेतीच्या कामाला वेग आला आहे. हा पाऊस शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील खाली गेलेली पाण्याची पातळी सावरण्याचे काम करील, असा विश्वास वाटू लागला आहे. त्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्याची चिंताही दूर झाली आहे.

### अपघातात महिलेचा जागीच मृत्यू



वाडा : भिवंडी वाडा महामार्गावरील कुडूस येथील स्मशानभूमी जवळ रात्रीच्या सुमारास दुचाकीच्या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे तर दुचाकी चालक जखमी झाला आहे. रविंद्र मुकणे (वय ४२) व रंजना मुकणे (वय ३८) दोघे हे दुचाकीवरून खरीवली येथून दुपारे पाडा येथे येत असताना कुडूस खिंडीजवळ येताच अज्ञात वाहनाने कट मारल्याने दुचाकीचालक रविंद्र यांचे नियंत्रण सुटल्याने मागे बसलेल्या रंजना खाली पडल्या त्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांच्या मृतदेहावर वाडा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे. तर जखमी रविंद्र यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करून घरी पाठवण्यात आले आहे.

### शासकीय वसतिगृहांसाठी निधी मंजुर

औरंगाबाद : समाज कल्याण विभागामार्फत राज्यात एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे चालवली जातात त्यापैकी ३३ वसतिगृहांच्या दुरुस्तीसाठी प्रस्तावित केलेल्या कामांना सामाजिक न्याय मंत्री धनंजयय मुंडे व सचिव सुमंत भांगे यांच्या पुढाकाराने मंजुरी मिळाली असुन त्यासाठी ७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असल्याचे राज्याचे समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे. राज्यातील सर्व वसतिगृहांचे बांधकाम संदर्भात नुकतीच ऑनलाईन आढावा बैठक डॉ.नारनवरे यांनी घेतली त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. मुंबई विभागास १.८१ कोटी, लातुर विभाग १.३२ कोटी, अमरावती विभाग २.७८ कोटी, पुणे विभाग १.२३ कोटी, नाशिक विभागास २४ लक्ष ७२ हजार, नागपुर विभाग २ लक्ष ४० हजार , औरंगाबाद विभाग ७ लक्ष ८७ हजार, याप्रमाणे एकुण ७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध क्षेत्रीय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीतुन वसतिगृहांची विविध दुरुस्ती कामे, कपाटे अद्ययावत करणे, इमारत कलरिंग करणे, कोटींग करणे, आवार संरक्षक भिंत उभारणे, शौचालय, बाथरुम, खिडक्या, दरवाजे, तारेचे कम्पाउंड, भिंतींची दुरुस्ती, ग्राऊंड फ्लोरिगं, रोलिंग, पाण्याची टाकी, स्ट्रिट लाईट, पेव्हर ब्लॉक बसविणे, टाईल्स बदलविणे, वॉटर प्रुफिंग, ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे, बोअरवेल बांधकाम करणे अशी कामे करण्यात येणार आहे. विद्यार्थांच्या शैक्षणिक विकासात महत्वाची भुमिका असलेल्या शासकिय वसतिगृहांच्या इमारतींची दुरुस्ती करुन सर्व आवश्यक सोईसुविधांसह विद्यार्थांना निवासासाकरिता तसेच अभ्यासाकरिता पुरक वातावरण यामुळे उपलब्ध होणार आहे.

# वंचितचे शहर संघटक प्रकाश सिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न





**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगरमध्ये वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक प्रकाश सिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील शेकडो तरुणांनी रक्तदान केलं असून रक्तदान करण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलंय. 'रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये आज काही प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन रक्ताचा तुटवडा भासू नये आणि गरजेच्या वेळेस मागेल त्याला रक्त उपलब्ध व्हावे याकरीता वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक प्रकाश सिरसाट यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातील अनेक शेकडो तरुणांनी रक्तदान केलं. वंचित बहुजन आघाडीचे ठाणे जिल्ह्यातील नेते सारंग थोरात, शहर अध्यक्ष शेषराव वाघमारे, महिला शहर अध्यक्ष रेखाताई उबाळे सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# चोरीस गेलेल्या पिकअपसह १४ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, २ आरोपींना २४ तासात अटक

**लातूर/प्रतिनिधी**



पोलीस ठाणे गांधी चौक येथे येऊन नमूद गुन्ह्यातील फिर्यादीने त्याच्या मालकीची बोलोरो पिकप गाडी क्रमांक एम.एच.२४ एफ. ९८३६ हि दिनांक २७/०६/२०२२ रोजी ते २८/०६/२०२२ रोजीच्या मध्यरात्री कोणीतरी अज्ञात चोरट्याने सम्राट चौक परिसरातून चोरून नेली आहे. वगैरे फिर्याद वरून पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २८८/२०२२ कलम ३७९ भावी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला गुण्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक कोले हे करीत होते. सदर गुन्हा उघडकीस आणने कामी पोलीस अधीक्षक निखील पिंगळे लातूर, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उप विभागीय पोलीस अधीकारी जितेंद्र जगदाळे (लातूर शहर) याचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात गुन्ह्यातील अरोपीच्या शोधकामी स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाण्याचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करीत असताना पथकास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सम्राट चौक येथून चोरीस गेलेली बोलेरो पिकअप वाहन वैराग ते सोलापूर जाणारे रोडवर एका धाब्याच्या बाजूला लपवून ठेवलेला आहे. अशी माहिती मिळताच सदर पथक वैराग ते सोलापूर जाणारे रोडवरील नमूद ठिकाणी पोहोचून पाहणी केली असता गुन्ह्यात चोरीस गेलेले बोलेरो पिकअप तेच असल्याचे निष्पन्न झाले.

पथकाने सदर ठिकाणी सापळा लावला थोड्याच वेळात त्या पिकअप मध्ये दोन इसम बसताना पथकाने त्यांना ताब्यात घेतले व त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव अकबर हसन शेख, वय ३५ वर्ष, राहणार फुलेनगर, केज जिल्हा बीड सध्या राहणार बरकत नगर लातूर, सचिन शेषराव मोरे, वय ३३ वर्ष, राहणार भीम नगर, परळी जिल्हा बीड सध्या राहणार आनंद नगर, लातूर असे असल्याचे सांगून नमूद पीकअप वाहन त्याने सम्राट चौक येथून चोरी केल्याचे कबूल केले त्यावरून नमूद आरोपींना त्यांनी गुन्ह्यात चोरलेल्या पिकअप वाहन व चोरी करताना वापरलेले कार सहित १४ लाख रुपयाचा मुद्देमाल पोलीस स्टेशन गांधी चौक येथे आणून नमूद आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपास पथकातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने मिळालेल्या माहितीचा बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून गुन्हा उघडकिस आणून गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार दामोदर मुळे, युसूफ शेख, रणवीर देशमुख, शिवाजी पाटील, दत्ता शिंदे, रणजीत शिंदे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे दीनानाथ देवकते, प्रमोद तरडे यांनी केली आहे.

# रोटरी क्लब ऑफ भिवंडी मेनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदतीचे वितरण

**भिवंडी/अभिजित हिरे**





रोटरी क्लब ऑफ भिवंडी मेनच्या वतीने नुकताच भिवंडी शहरातील दहा विद्यार्थ्यांना संपूर्ण वर्ष भरासाठीची शैक्षणिक फी भरण्यासाठी आर्थिक मदतीचे वितरण धनादेशाद्वारे डिस्ट्रिक गव्हर्नर मिलिंद कुलकर्णी यांच्या शुभहस्ते असिस्टंट गव्हर्नर सुचित गडकरी, रोटरी क्लब ऑफ भिवंडी मेनचे अध्यक्ष हितेंद्र मेहता यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ भिवंडी मेनची नवी कार्यकारणी बुधवारी सायंकाळी नझराणा कंपाऊंड येथील रोटरी हाऊस येथे जाहीर करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी हितेंद्र मेहता, सरचिटणीस रवी मोदी व कार्यकारिणीत सदस्य महेश कुमावत, राजेंद्र जैन, महेश आंग्रे, रमेश मालाणी, दिलीप पोद्दार, पराग मेहता, भावेश बंजारा आदींच्या नियुक्तीची घोषणा करून त्यांचा शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला होता .त्यामध्ये नवनिर्वाचित अध्यक्ष हितेंद्र मेहता यांनी शहरातील गरीब दहा विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत देत असतानाच दहावी बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला. तर वर्षभरामध्ये ग्रामीण भागातील एका शाळेस हॅप्पी स्कुल बनविण्यासाठी दत्तक घेऊन मदत केली जाणार असून भिवंडी रोड रेल्वे स्थानका वर रेल्वे प्रवाशांच्या मदती करीता इंडिकेटर भेट देणार असल्याचे जाहीर केले. या कार्यक्रमा दरम्यान सलग ५० वर्ष रोटरी क्लब साठी अविरत सेवाव्रत असणारे दासभाई पटेल यांच्या सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास मावळते अध्यक्ष सुरेश गरेला, भावी अध्यक्ष इलियास मेमन यांसह नवनियुक्त अध्यक्ष हितेंद्र मेहता यांना शुभेच्छा देण्या करीता भाजपा भिवंडी शहराध्यक्ष संतोष शेट्टी, हसमुख पटेल, संजय शहा, पी.के. म्हात्रे, यांसह असंख्य हितचिंतक उपस्थित होते.

# चारचाकी वाहन चोर माणिकपूर पोलिसांच्या जाळ्यात

विरार : मागील आठवड्यात तक्रारदार दिनेश काशमभाई पटेल यांनी आपली मारुती सुझुकी इकोकार चोरी झाल्याची तक्रार माणिकपूर पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा रजि. क्र. २२६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरू केला.

गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार आधारे सापळा रचून आरोपी सुनील चार्लस वाघमारे (वय २३) याला वसई (पूर्व) गोखिवरे परिसरातून ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरी केलेली इको कार हस्तगत करण्यात आली. तसेच त्याचा साथीदार रामजीत नरेश भारती (वय २३) रा. कुंभारपाडा, विरार (पूर्व) याला सुद्धा टाकी रोड, नालासोपारा (पुर्व) येथून गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या मोटारसायकलसह ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (वसई) प्रदीप गिरीधर, माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि. सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, पोहावा. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी व पोशि. प्रवीण कांदे यांनी कामगिरी केली आहे.

## पार्किंग मधील ट्रक मधून ३०० लिटर डिझेलची चोरी

**भिवंडी** : भिवंडी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर ट्रान्सपोर्ट वाहने येत असून रात्रीच्या वेळी विविध भागात उभ्या असलेल्या ट्रक मधील डिझेल चोरी करणारी टोळी सक्रिय झाली असल्याचे एका दाखल गुन्ह्यातून समोर आले आहे. भिवंडी तालुक्यातील काल्हेर येथील अरीहंत कंपाऊंड येथील महावीर ट्रान्सपोर्ट कंपनी समोर भारत बेंज कंपनीची ट्रक क्रमांक TN 18 BF 4032 रात्रीच्या वेळी उभी करून ठेवली असता मध्यरात्रीच्या सुमारास स्विफ्ट कार क्रमांक MH 05 CH 3681 मधून आलेल्या चालकाने या तर्कच्या डिझेल टाकीतून तब्बल ३०० लिटर डिझेल चोरी करून पलायन केले आहे. ट्रान्सपोर्ट कंपनी मधील व्यवस्थापक ओखाराम भगवानजी देवासी यांनी या बाबत नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली.नारपोली पोलिसांनी अज्ञात कार चालका विरोधात २८ हजार ५०० रुपये किमतीचे डिझेल चोरी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# राज ठाकरे यांच्या निरोगी स्वास्थ्यासाठी भिवंडीत हवन करून देवीला घातले साकडे!

**भिवंडी/अभिजित हिरे**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शस्त्रक्रियेनंतर निरोगी स्वास्थ्यासाठी भिवंडी मनविसे कडून हवन करून देवीला घातले साकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरे ह्यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रिया यशस्वी होऊन सुखरूप घरी आल्याबद्दल, भिवंडी तालुक्यातील सोनाळे शाखेच्या वतीने दिंडीगड ह्या डोंगरावरील दिंडेश्वरी देवीच्या मंदिरात होम हवन करून महापूजा करण्यात आली. महाराष्ट्राचे हिंदुजननायक राज ठाकरे यांना देवीने स्वास्थ आणि बळ देवो, अशी प्रार्थना देवीचरणी करण्या आली. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुका अध्यक्ष परेश चौधरी यांनी अशी माहिती दिली. ह्या कार्यक्रमासाठी हर्षल भोईर कल्याण तालुका अध्यक्ष, ॲड. सुनिल देवरे पाहुणे म्हणून उपस्थित होते. ह्या कार्यक्रमासाठी संतोष राजाराम पाटील, सुरज पाटील, सचिन पाटील, सचिन का.पाटील, अजय तरे, अमोल पाटील, अंकुश चौधरी आदी महाराष्ट्र सैनिक यावेळी उपस्थित होते.

# फडणवीस यांची शिंदेशाही!

राजकारणात रिमोट कंट्रोल हा असतोच! त्यामुळे पक्ष असो किंवा सरकार ते कुणाच्या कुणाच्या इशाऱ्यावर चालत असते आणि ज्याच्या हातात रिमोट कंट्रोल असतो तो किंग मेकर ठरतो. महाराष्ट्रात सध्या एकनाथ शिंदे हे जरी मुख्यमंत्री असेल तरी त्यांच्या सरकारचा रिमोट कंट्रोल हा देवेंद्र फडणवीस म्हणजेच भाजपच्या हातात असणार आहे. अशावेळी शिंदे यांनी किती जारी दावे केले तरी त्यांना फडणवीस किंवा भाजपच्या परवानगी शिवाय कोणतेही काम करता येणार नाही. त्यामुळे त्यांना नामधारी मुख्यमंत्री म्हणायला हरकत नाही आणि नामधारी मुख्यमंत्र्याला जनतेत सुद्धा फारसा मान नसतो त्यातच ज्या पद्धतीने शिंदे शिवसेना फोडून मुख्यमंत्री झाले त्याचा महाराष्ट्राला राग आहे. कारण बाळासाहेबांनी मोठ्या कष्टाने उभी केलेली शिवसेना मराठी माणसांसाठी स्वाभिमानाचा मानबिंदू बनलेली होती, पण उद्धव ठाकरे यांच्या काही चुकीच्या धोणांमुळे शिवसेनेत नाराजी पसरली आणि त्याचा शिंदे सारख्या लोकांनी फायदा घेतला. महाराष्ट्राच्या राजकारणात ऐवढे घाणेरडे राजकारण कधीच बघायला मिळाले नव्हते. वाईट एकाच गोष्टीचे वाटतेय की सरकार शिंदेंचे असेल तरी सरकारी निर्णय मात्र भाजपचे असतील. उद्या महाराष्ट्रापासून विदर्भ तोडण्याचा प्रयत्न झाला तरी शिंदे भाजपला विरोध करू शकणार नाहीत किंवा देशाची आर्थिक राजधानी केंद्रशाषित करण्याचा प्रयत्न झाला तरी शिंदे त्याला विरोध करू शकणार नाहीत आणि यातच महाराष्ट्राचे मोठे नुकसान आहे. त्यामुळे शिंदेशाही महाराष्ट्रासाठी हानिकारक आहे. देशाच्या राजकारणात आघाडी सरकारला फारसे भवितव्य नसते आणि जनता पक्षाच्या राजवटीपासून हे चित्र भारतीय जनतेने पाहिले आहे . सत्तेसाठी एकत्र यायचे आणि जो काही दोन चार वर्षांचा काळ मिळेल त्यात उभा आडवा हात मारून पुन्हा आपापल्या मार्गाने जायचं याच धोरणाच्या आधारे आघाडी सरकारे बनतात आणि कोसळतात. अडीच वर्षापूर्वी अनैसर्गिक आघाडीतून तयार झालेले महा विकास आघडीचे सरकार अखेर कोसळले आणि ते कोसळणारच होते. पण ते ज्या कारणामुळे कोसळले ते महाराष्ट्रासाठी धक्कादायक आहे. कारण शिवसेनेसारख्या अभेद्य पक्षात कधी एवढी मोठी गद्दारी होईल असे कुणाला स्वप्नातही वाटले नव्हते, पण राजकारणात काहीही घडू शकते. असो आता महाराष्ट्रात शिंदेशाहीचे सरकार आले आहे. पण त्याचा रिमोट कंट्रोल फडणवीस यांच्या म्हणजेच पर्यायाने मोदी-शहा यांच्या हाती आहे. त्यामुळे भाजपा आणि फडणवीस यांच्या समोर शिंदेंच्या काही चालणार नाही आणि पहिल्याच दिवशी त्याचा प्रत्यय आला. फडणवीस यांनी जलशिवार योजना तसेच मेट्रोच्या कार शेड बाबतचे काही महत्वाचे निर्देश प्रशासनाला दिले. वास्तविक अशा महत्वाच्या निर्णयांना कॅबिनेटची मंजुरी लागते, पण अजून मंत्रिमंडळ अस्तित्वात आलेले नाही. त्यामुळे कागदोपत्री दाखवण्यासाठी शिंदे आणि फडणवीस या दोनच मंत्र्यांची कॅबिनेट झाली आणि त्यात काही निर्णय सुद्धा झाले. आता हे नेहमीच असे होणार म्हणून तर भाजपा पक्ष श्रेष्ठींनी फडणवीस यांना मंत्रिमंडळात सामील होण्याचा आग्रह धरला आणि मुख्यमंत्रीपद भूषविले फडणवीसांवर उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्याची नामुष्की ओढवली. अर्थात ते जरी उपमुख्यमंत्री असेल तरी शिंदे त्यांच्या उपकरणांच्या ओझ्याखाली दबलेले असल्याने फडणवीस यांचेच आदेश त्यांना पाळावे लागणार आहेत. त्यामुळे या सरकारचा उल्लेख करताना फडणवीस यांची शिंदेशाही असेच म्हणावे लागेल. तसे पाहता सरकार समोर भ्रष्टाचाराचा मुद्दा सोडला तर अनेक आव्हाने आहेत. भ्रष्टाचाराचे आव्हान यासाठी नाही की ईडीच्या रडारवर असलेले सगळे लोक आता भाजपच्या गोतावळ्यात सामील झालेत. त्यामुळे तोतला भायला तोंड उघडायला आणि भ्रष्टाचाराच्या विरुद्ध बोलायला जागाच उरलेली नाही. भाजपात जो जो गेला तो पवित्र झाला. हे आता सगळ्यांनाच ठाऊक झाले आहे. त्यामुळे शिंदेशाईमध्ये भ्रष्टाचाराचा मुद्दा निकाली निघाला आहे. आता बाकीचे प्रश्न आहेत ते केंद्राच्या मदतीने सुटतील. ज्यात मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न, राज्यावरील ५ लाख कोटींच्या कर्जाचा प्रश्न, वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या कोळसा टंचाईचा प्रश्न असे कितीतरी प्रश्न आहेत ते सगळे फडणवीस सोडवतील. त्यामुळे चिंतेचे कारण नाही. राहता राहिला सवाल शिवसेनेचा तर उरली सुरली शिवसेना संपवणे आता कठीण नाही. फक्त सत्ता राहिली पाहिजे. केंद्र सरकार आणि अंबानी-अदानी यांच्या आशीर्वादाने सारं काही सुरळीत होईल. बघुया आणखी अडीच वर्षात फडणवीस यांचा हे शिंदेशाही सरकार आणखी काय काय करते. शिंदेशाही सरकारकडून तशा फारशा अपेक्षा नाहीत. पण महाराष्ट्राचे जे मुलभूत प्रश्न आहेत. खास करून अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान आणि त्यामुळे दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट यामुळे शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळणे आवश्यक आहे. त्याच बरोबर जे रखडलेले प्रकल्प आहेत ते तत्काळ मार्गी लावण्याचे सरकारने आश्वासन दिलेले असले तरीत्यात कायदेशीर अडचणी निर्माण होऊन हे प्रकल्प पुन्हा रखडण्याची शक्यता आहे. यात मेट्रोच्या कारशेडचा प्रश्न कळीचा मुद्दा ठरणार आहे. कारण आघाडी सरकारला मेट्रोची कारशेड कांजुरमार्गमध्ये करायची होती, पण त्याला भाजपने विरोध करून मेट्रोची कारशेड आरे मधीच करावी अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे हा प्रश्न आता न्यायालयात जाण्याची शक्यता आहे, तसे झाले तर मेट्रोचे काम आणखी रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांच्या हिताच्या प्रकल्पांवर कोर्ट कचेऱ्या होणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी. सरकार आणि विरोधकांनीही लोकांच्या प्रश्नात राजकारण आणू नये.

## भारतीय वेबसाईट्स हॅक करणारे 'ड्रॅगन फोर्स मलेशिया' कोण आहेत?




भाजपच्या निलंबित राष्ट्रीय प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी काही दिवसांपूर्वी इस्लाम आणि मोहम्मद पैगंबर प्रेषितांसंदर्भात केलेल्या अवमानकारक वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर हे सायबर हल्ले केले जात आहे. नुपूर शर्मा यांची सहा वर्षासाठी पक्षामधून हकालपट्टी करण्यात आली आहे. इस्लामिक देशांमध्ये या वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर संताप व्यक्त केला जातोय. याच साऱ्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुस्लीमबहुल देश असणाऱ्या मलेशियामधील या हॅकर्सच्या ग्रुपने सायबर हल्ल्यांच्या माध्यमातून भारताला धडा शिकवणार असल्याचा दावा केलाय.

**दिशायन**

अशाप्रकारे सायबर हल्ले होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही वेगवेगळ्या हॅकर्स ग्रुपने जगभरातील वेगवगेळ्या देशांमध्ये सायबर हल्ले केलेत. त्यातही अनॉनिमस हा जगातील सर्वात मोठा हॅकर्सचा ग्रुप मानला जातो. ड्रॅगन फोर्स मलेशिया या हॅकर्स ग्रुपने जगभरातील हॅकर्सला भारत सरकारच्या मालकीच्या माहिती तंत्रज्ञान इन्फ्रास्ट्रक्चरवर सायबर हल्ले करायला लावले. हॅकर्सच्या ग्रुपने ट्विटरवरुन भारतीय वेबसाईट्सवर सायबर हल्ले करण्याच्या मोहिमेला 'स्पेशल ऑप्रेशन' असं म्हणतं, सायबर हल्ले करण्याची घोषणा केली. पण हे हॅकर्स नेमके आहेत कोण?

### ड्रॅगन फोर्स मलेशिया आहेत तरी कोण?

ड्रॅगन फोर्स मलेशिया या ग्रुपने २०२१ साली आपली वेबसाईट सुरु केली. या ग्रुपमध्ये एकूण १३ हजार सदस्य आहेत. या ग्रुपच्या वेबसाईट्सवरच हॅकर्स चर्चा करतात. या वेबसाईटवर ११ हजार डिक्शन थ्रेड म्हणजेच चर्चेसंदर्भातील तपशील आहेत. हा फार सक्रीय ग्रुप आहे. हा ग्रुप पॅलिस्टाइनला समर्थन करतो. त्यामुळेच त्यांच्याकडून अनेकदा इस्त्रायलशीसंबंधित वेबसाईट्स हॅक केल्या जातात. टीथ्री डायमेन्शन टीम आणि रिलिक्सक्रू सारख्या हॅकर्स ग्रुपसोबत या ग्रुप काम करतो. या ग्रुपचं एक टेलिग्राम चॅनेल, ट्विटर हॅण्डल आणि इतर सोशल मीडिया अकाऊंटही आहेत. नुकताच ११ एप्रिल २०२२ रोजी त्यांनी इस्त्रायलच्या सरकारी वेबसाईट्सवर हल्ला करुन अनेक महत्वाची कागदपत्रे लीक केली होती.

### भारतीय वेबसाईट्सवर हल्ला

ड्रॅगन फोर्स मलेशिया नावाच्या हॅकर्स ग्रुपने देशातील अनेक वेबसाईट्सवर हल्ले केलेत. यामध्ये इस्त्रायलमधील भारतीय दुतावासाच्या वेबसाईट, राष्ट्रीय शेती व्यवस्थापनाची वेबसाईट आणि कृषी संसोधन केंद्राच्या वेबसाईट्सचा समावेश आहे. या वेबसाईट्ससोबत इतरही अनेक वेबसाईटवर सायबर हल्ले करण्यात आले आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार एक दोन नाही तर तब्बल ७० हून अधिक भारतीय वेबसाईट्सवर हे सायबर हल्ले करण्यात आले आहेत. रविवारी रात्री उशिरा भारतातील इस्त्रायलच्या दुतावासाला वेबसाइट रिस्टोअर करण्यात यश आले आहे. मात्र त्यावरील काही पेजेसवर अद्यापही तांत्रिक अडचणी कायम आहेत.

### इतरांनाही केले आवाहन

या गटाने सायबर हल्ला केलेल्या वेबसाइट्सच्या यादीमध्ये दिल्ली पब्लिक स्कूल, भवन्स आणि इतर शैक्षणिक संस्थांच्या वेबस्टाईसचा समावेश आहे. सायबर हल्ले करण्यात आलेल्या ७० पैकी ५० वेबसाईट्स या महाराष्ट्रातील आहेत. यापैकी अनेक वेबसाईट्सवर या हॅकर्सने ऑडिओ नोट पोस्ट केलीय. यामध्ये, तुम्हाला ज्याप्रमाणे तुमचा धर्म आहे तसाच आमच्यासाठी आमचा धर्म आहे, असं वाक्य ऐकू येत आहे. या हॅकर्सने जगभरातील मुस्लीम हॅकर्सला भारतीय वेबसाईटवर सायबर हल्ले करण्यासाठी आवाहनही केलं आहे. मानवी हक्कांसाठी लढणाऱ्यांनीही या हल्ल्यामध्ये सहभागी व्हावं असं ड्रॅगन फोर्स मलेशियाने म्हटले.

## रोजगार निर्मितीसाठी; शेळी समूह योजना

**राज्यातील शेतीला पूरक उद्योगाची जोड देणे अतिशय आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनावर आधारित आणि हमखास उत्पन्न देणारा शेळीपालन पूरक उद्योग रुजला आहे .या उद्योगाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करण्यासाठी राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत शेळी समूह योजना सुरू करण्यात आली आहे या योजनेबाबत...**





राज्यामध्ये अंदाजे बहूसंख्य कुटुंबांना शेळी पालनामधून अर्थार्जन होत आहे. हा व्यवसाय प्रामुख्याने अवर्षणप्रवण, दुष्काळी आणि निमदुष्काळी भागामध्ये केला जातो. कोरडे हवामान शेळ्यांना पोषक असते. अन्य कोणतेही पशुधन पाळण्यास मर्यादा येतात, तेथे शेळी पालन उत्तम पर्याय आहे. अत्यंत कमी चाऱ्यावर, कठीण परिस्थितीतसुद्धा शेळ्या तग धरु शकतात. त्यांची वातावरणातील बदलाशी त्वरीत जुळवून घेण्याची क्षमता असते. अत्यंत कमी भांडवलातही व्यवसाय सुरु करता येऊ शकतो. त्यामुळे शेतकरी, बेरोजगार तरुण याकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहत आहेत. शासन विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना शेळी पालन करण्यासाठी प्राधान्य देत आहे.

राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी व मेंढी महामंडळ आणि गोट बँक ऑफ कारखेडा यांचे संयुक्त विद्यमाने महिलांना शेळ्या वाटप करण्यात आले आहे. प्रायोगिक तत्वावर ५०० शेळीधनाचे वाटप करून येत्या काळात संपूर्ण राज्यात हा प्रयोग राबविण्यात येणार आहे. महामंडळाच्या प्रक्षेत्रावरचे बळकटीकरण, आधुनिकीकरण करण्यासाठी ९४ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहे. यामधून पायाभूत सुविधा बळकटीकरण त्याचबरोबर आधुनिक यंत्रसामुग्री घेतली जाणार आहे. राज्यातील पाच महसूली विभागामध्ये शेळी समूह योजना राबविण्यास तत्वत: मान्यता मंत्रिमंडळाने दिली आहे. राज्यस्तरीय योजने अंतर्गत पोहरा, जि. अमरावती येथे शेळी समूह योजना राबविण्यात येणार आहे.

### योजनेचा उद्देश

(१) समूह विकासामधून शेळीपालन व्यवसायास गती देणे. (२) नवीन उद्योजक निर्माण करणे. (३) शेळी पालकांचे उत्पादक कंपनी, फेडरेशन, संस्था स्थापन करून त्या माध्यमातून त्यांना शेळी पालन प्रशिक्षण, सुविधा पुरविणे, तांत्रिक माहिती, अद्ययावत तंत्रज्ञान, आरोग्यसुविधा, अनुवंशिक सुधारणा करणे. (४) बाजारपेठ उपलब्ध करून देणे. (५) फॉरवर्ड लिंकेजेस निर्माण करून देणे, शेळी पालनकरिता लागणाऱ्या वस्तू, साहित्य उपलब्ध करून देणे. (६) शेळ्यांच्या पैदास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

### पाच महसूली विभागामध्ये शेळी समूह योजना

योजनेचे ठिकाण १. बोंद्री, ता. रामटेक, जि. नागपूर. योजनेचे कार्यक्षेत्र नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली. २. तिर्थ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. योजनेचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद.३. रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली योजनेचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर ४. बिलाखेड, ता. चाळीसगांव, जि. जळगांव योजनेचे कार्यक्षेत्र नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर ५. दापचरी, जि. पालघर योजनेचे कार्यक्षेत्र मुंबई शहर, मुंबई उपनगरे, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग.

### योजनेअंतर्गत समाविष्ट बाबी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पोहरा, जिल्हा अमरावती यांच्या ताब्यात असलेली व पशुसंवर्धन विभागाच्या नांवे असलेल्या ९.५ एकर क्षेत्रावर प्रामुख्याने खालील सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

### सामूहिक सुविधा केंद्र

शेतकऱ्यांना शेळीपालन व्यवसायासंबंधीत विषयाचे सखोल ज्ञान व्हावे, याकरिता स्टेट ऑफ द आर्ट (State-of-the-art) ही संकल्पना विचारात घेऊन शेळी समुह प्रकल्पांतर्गत २ एकरक्षेत्रावर सामूहिक सुविधा केंद्र उभारण्यात येणार. त्यामध्ये प्रशिक्षण केंद्रसह १०० प्रशिक्षणार्थी करिता अनुषंगिक सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे.

### शेळ्यांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया केंद्र

२.५ एकर क्षेत्रावर शेळ्यांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया केंद्राचे २ युनिटस स्थापन करण्यात येणार. याकरिता लागणाऱ्या इतर सर्व सुविधा जसे, बांधकामे, यंत्रसामुग्री इ. उभारणी प्रक्षेत्रावरील जमीन खाजगी व्यक्तीस,संस्थेस भाडेकरारावर विहित प्रक्रियेचा अवलंब करुन देण्यात येणार. ज्या व्यक्ती/संस्थेस भाडेकरारावर जमीन देण्यात येईल, ती व्यक्ती, संस्था सदर केंद्राची उभारणी करणार.

### शेळ्यांचे मांस प्रक्रिया केंद्र स्थापन करणे

सुमारे १.५ एकर क्षेत्रावर मांस प्रक्रिया केंद्र (१ युनिट) स्थापन करण्यात यावे. याकरिता लागणाऱ्या इतर सर्व सुविधा जसे, बांधकामे, यंत्रसामुग्री इ. उभारणी प्रक्षेत्रावरील जमीन खाजगी व्यक्तीस, संस्थेस भाडेकरारावर विहित प्रक्रियेचा अवलंब करुन देण्यात यावी. ज्या व्यक्ती, संस्थेस भाडेकरारावर जमीन देण्यात येईल, ती व्यक्ती, संस्था सदर केंद्राची उभारणी करेल.

### शेळी उत्पादक कंपनी व खाजगी व्यावसायिकांकरिता कार्यालय

प्रकल्पांतर्गत सुमारे ०.५ एकर क्षेत्रावर शेळी उत्पादक कंपनी व खाजगी व्यावसायिकांसाठी कार्यालय उभारण्यात येणार. सदर कार्यालय शेळी उत्पादक कंपनी किंवा खाजगी व्यवसायिकांना भाडे करारावर देण्यात येणार.

**प्रकल्पाची अपेक्षित उद्दिष्टे :** (१) प्रकल्पाअंतर्गत समाविष्ट असलेल्या जिल्ह्यातील सुमारे ३० हजार शेतकऱ्यांचे समूह तयार करून, त्या माध्यमातून त्यांना शेळी पालन व्यवसायाकरिता प्रवृत्त करणे, तसेच त्यांचे या व्यवसायाबाबतचे कौशल्य विकसित करून, त्यांच्यामध्ये स्वयंरोजगार निर्मिती होऊन त्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचविण्यास याचा फार मोठा हातभार लागणार आहे. (२) या भागातील शेळी पालकांना सतत निर्माण होणारा शेळ्यांच्या विपणन व्यवस्थेचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे, यामुळे शेतकऱ्यांकडे उपलब्ध होणाऱ्या शेळ्यांना निश्चितच जास्त किंमत मिळून त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. (३) शेळ्यांपासून मिळणाऱ्या विविध पदार्थ व उपपदार्थ यांचे प्रक्रिया उद्योग उभारण्यात येणार आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात नवीन उद्योजक निर्माण तर होईलच, त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती सुद्धा होईल. (४) प्रक्रिया उद्योगामध्ये निर्माण होणारे नाशवंत पदार्थ जास्त दिवस साठवता यावे याकरिता शितगृह स्थापन करण्यात येत आहे. याचा फायदा उत्पादकांना होऊन, त्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यापार वाढविण्यास मदत होऊन याचा फायदा निश्चितच शेळी पालकांना होणार आहे.

**– राजू हिरामण धोत्रे, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.**

## यंदाचे शैक्षणिक वर्ष शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी वर्ष म्हणून साजरे करणार

**मुंबई/प्रतिनिधी**

मागील दोन वर्षात विद्यार्थ्यांचा झालेला अध्ययन ऱ्हास भरून काढण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट टप्या-टप्याने साध्य करण्यात येणार आहे. यासाठी २०२२-२३ हे शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यादृष्टीने नाविण्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी दिली.

शैक्षणिक गुणवत्तावृद्धी वर्ष सन २०२२-२३ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमाअंतर्गत शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करणे, सर्व विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता विकसित करणे, विद्यार्थ्यांची अध्ययन वृद्धी करण्यासाठी राज्यस्तरावरून शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन करून अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे यावर भर देण्यात येणार आहे. शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्यासाठी ५ ते २० जुलै २०२२ या कालावधीत 'मिशन झीरो ड्रॉप आऊट' राबविण्यात येणार आहे.



विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता विकसित करून अध्ययन वृद्धी साध्य करण्यासाठी पुनर्रचित सेतू अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. याअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शालेय कामकाजाचे एकूण तीस दिवस व दोन चाचण्या अशा स्वरूपाचा सेतू अभ्यास परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची संपादणूक वृद्धी साध्य करण्यास मदत होणार आहे.

मागील दोन वर्षापासून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अंगणवाड्या-बालवर्ग बंद आहेत. त्यामुळे तीन ते सहा वयोगटातील बालकांची शाळापूर्व तयारी होऊ शकलेली नाही. यामुळे राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये जून, २०२२ मध्ये इयत्ता पहिलीत प्रवेशित होणाऱ्या बालकांची शाळेतले पहिले पाऊल पुस्तिका, कृतिपत्रिका व आयडिया कार्ड या साहित्याच्या आधारे शाळापूर्व तयारी करण्यात येणार आहे. याबरोबरच पायाभूत भाषिक साक्षरता व गणितीय कौशल्य विकसन कार्यक्रम राबविणे, शाळापूर्व तयारी कार्यक्रम अंमलबजावणी, नियमित मूल्यमापन योजना, आनंददायी अभ्यासक्रम योजना, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शिक्षक आणि अधिकाऱ्यांचा विदेश आणि राज्य अभ्यास दौरा योजना, पूरक अध्ययन साहित्याचा वापर, शाळा सुशोभिकरण, स्वच्छता व अध्ययन समृद्ध शालेय परिसर यासाठी प्रयत्न करणे, मिलाप' कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना भविष्यातील अनिश्चिततेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी तयार करणे, शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेऊन यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्ह्याचे 'शिक्षण दूत' म्हणून गौरव करणे आदी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे तसेच हे उपक्रम राबविण्यासाठी शिक्षण आयुक्त हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील असे याबाबतच्या शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# राजर्षी छत्रपती राजर्षी शाहू महाराज १४८वी जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन कार्यक्रम संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा उपयोग हा आपल्या प्रजेतील सर्वसामान्य जनतेच्या उद्धारासाठी केला त्यामुळेच ते लोकराजे झाले असे प्रतिपादन दृष्टीबाधित स्पर्धा परीक्षा अभ्यासक राहुल गोदाम यांनी केले. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १४८वी जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी ते राष्ट्र उद्धारक: छत्रपती राजर्षी शाहू महाराज या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आयक्युएससीचे समन्वयक कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ.संजय गवई, प्रा. काशिनाथ पवार, गणेश शेटे, विमलताई गोदाम आणि वीरसेन उटगे यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसेटवार आणि सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. पुढे बोलताना राहुल गोदाम म्हणाले की, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण हे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून ते सक्तीचे व मोफत केले. तसेच विधवा पुनर्विवाह कायदा तयार करून विधवांना सन्मानाचे जीवन प्रदान केले. प्रशासनामध्ये बहुजनांना ५०टक्के आरक्षण त्यांनी जाहीर केले. त्यामुळे त्यांना सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ म्हणून सुद्धा संबोधले जाते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आपल्या देशामध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अद्वितीय आहे त्यांनी आपल्या सबंध जीवनामध्ये सातत्याने प्रजेचा विचार केला. समाजामध्ये लोकशाही मूल्याची पाळेमुळे रुजविली आणि म्हणूनच त्यांना समाज सुधारक म्हणून सुद्धा संबोधले जाते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय गवई यांनी केले, प्रास्ताविक डॉ.रत्नाकर बेडगे यांनी तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनायक लोमटे, बालाजी डावकरे, संतोष येंचेवाड, कृष्णा कोळी, शुभम बिरादार, वर्षा रसाळ, खंडू देडे यांनी परिश्रम घेतले.

# सुपीकता निर्देशांका नुसार संतुलित खताचा वापर करावा!

**पालघर/प्रतिनिधी**

शेतकरी शेती उत्पादक वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करतो. मातीचे विल्शेषण करुन आवश्यक असलेले खताचे केल्यास उत्पादक मध्ये वाढ होते. बऱ्याच वेळा आवश्यकपेक्षा जास्त रासायनिक खतांचा वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडते. आपल्या गावातील कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क करून गावाचा सुपीकता निर्देशांक जाणून घ्यावा त्यानुसार संतुलित खताचा वापर करावा. शेतकऱ्यांना पुरेसा आणि योग्य दरात खते उपलब्ध व्हावेत या साठी कृषी विभाग मार्फत मागणीनुसार खत विक्री करण्यासाठी परवाने दिली जातात. या खत विक्री केंद्रावरून झजड मशीनदुवारे खताची विक्री करण्यात येते. खत विक्री केंद्रावर जातांना शेतकयांनी आपला आधार क्रमांक सोबत ठेवावे व आपले आधारावरच खत खरेदी करावे असे आव्हान करणेत येत आहे. युरिया खताची जिल्हाची मागणी १४७२० में उन युरिया ची मागणी असून ४९१८ मे. टन पुरवठा करण्यात आलेला आहे. आज रोजी २५२.२५ मे. टन युरिया बाजारात उपलब्ध असून संरक्षित युरिया खतः साठ्यामधून २८५ मे. टन युरिया उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

ज्या कृषी सेवा केंद्रांना युरिया खत उपलब्ध करून देलेले आहे तिथे कृषी विभागाचा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. युरिया खत शेतकऱ्यांनी त्यांचे जमिनीनुसार आवश्यक खत विकत घ्यावे. अनावश्यक खत खरेदी करू नये असे आव्हान मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी केले आहे. युरिया खताच्या किंवा बियाणे संदर्भात काही तक्रार असल्यास किसान कॉल सेंटर ९४०३८२१८७०, संबंधित पंचायत समिती कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.असे आवाहन संनियंत्रण अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, दिलीप नेरकर यांनी केले.

## थोडक्यात वृत्तांत

### वसईतील आयुष भिडे झळकणार मालिकेत



वसई : वसई मधील युवा अभिनेता आयुष्य भिडे या तरुणाने आपल्या अभिनय आणि मेहनतीच्या जोरावर मराठी मालिका 'आई कुठे काय करते' मध्ये स्थान मिळवले असून तो एका लक्षणीय भूमिकेत चमकणार आहे. नुकत्याच झालेल्या हिंदी राज्य नाट्य स्पर्धे मध्येही त्याच्या अभिनयाची चुणूक दिसून आली आहे. आयुषचे वडील आशिष भिडे एक उत्तम रंगकर्मी होते. मात्र कोरोनामध्ये वडील आणि आई अश्या दोघांच्या झालेल्या मृत्यूनंतर आयुषने खचून न जाता मोठया धैर्याने स्वतःला सावरत अभिनयाचे प्रशिक्षण सुरु ठेवले. मुंबई मधील नामांकित दिग्दर्शका सोबत सद्या तो काम करत असून, नुकताच त्याने नाट्य शिबीरात यशस्वीपणे सहभाग घेतला होता. त्याची आई कुठे काय करते मधील भूमिका निश्चित झाल्याबद्दल आणि एकंदर यशाबद्दल वसई मधील जेष्ठ रंगकर्मी विलास पगार, कैलास ठाकूर, अनिकेत शहाणे आणि संतोष गायकवाड यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

### आरपीएफकडून मोबाईल चोरट्याला अटक




नालासोपारा : नालासोपाऱ्यात आरपीएफकडून सातत्याने मोबाईल चोरांना पकडण्यात येत आहे. आरपीएफ मोबाईल चोरी प्रकरणात पुन्हा २७ वर्षीय चोरट्याला (रोहित लक्ष्मीनारायण गंजू) पकडून जीआरपी वसईच्या ताब्यात देण्यात आले आहे. चोरट्याकडून मोबाईल जप्त करण्यात आला आहे. आरपीएफ नालासोपारा प्रभारी राजीवसिंग सलारिया आल्यानंतर मोबाईल आणि पाकिट चोरांची अवस्था बिकट झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्टेशनवरून दररोज चोरट्यांना पकडले जात आहे.

### यंत्रमाग कारखान्यातून धाग्याची बॅग पळविली

भिवंडी : भिवंडी शहरातील जब्बार कंपाऊंड येथील एका यंत्रमाग कारखान्यात ५० किलो धागा असलेली बॅग अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली आहे. जब्बार कंपाऊंड येथील तनवीर हॉटेल जवळ मोहम्मद आरिफ मोहम्मद मुस्तफा शेखा यांचा यंत्रमाग कारखाना आहे. या ठिकाणी मध्यरात्रीच्या सुमारास रिक्षातून आलेल्या चोरट्यांनी कारखान्याच्या दरवाजातून आत प्रवेश करीत तेथे ठेवलेले २० हजार रुपये किमतीचे कॉटन धाग्याचे कोम असलेली ५० किलो वजनाची बॅग चोरी करून फरार झाले आहेत. या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### राष्ट्रीय चर्मकार महासंघाची कोअर कमिटी जाहीर

लातूर : राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांनी महासंघाच्या कार्याचा विस्तार व्हावा, संघटन वाढावे व कामात सुसुत्रता यावी यासाठी २१ जणांची एक कोअर कमिटी स्थापन केली असून, त्यामध्ये राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर (लातूर) यांचा समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भात जारी केलेल्या एका पत्रात राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप यांनी म्हटले आहे, महासंघाचे काम ग्रासरुटपर्यंत वाढविण्यासाठी व संघटनेच्या कोअर कमिटी स्थापन करण्यात येत असून, यात बबनराव घोलप, भाऊसाहेब कांबळे, रामचंद्र आवसारे, पंढरीनाथ पवार, भानुदास विसावे, ज्ञानेश्वर कांबळे, राजेंद्र राजूस्कर, आनंद गवळी, शशिकांत सोनवणे, उमाकांत डोईफोडे, माधव गायकवाड, डॉ.शांताराम कारंडे, लिलाधर कानोडे, गजानन भटकर, फुलचंद मालाधरी, गौतम बळवंते, पंढरीनाथ तांबटकर, भरत भरतुने, सी.के.मुरळीकर, गोपालसिंह बच्छीरे, राजू नेटके या २१ जणांचा समावेश आहे. दरम्यान कोअर कमिटीत संस्थापक अध्यक्ष घोलप यांनी संधी दिल्याबद्दल लातूरचे मुरळीकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### डेंग्यु, चिकुनगुन्या, हिवताप रोखण्यासाठी सुचना

लातूर : सध्या पावसाळयाचे दिवस असून डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याने त्यामुळे डेंग्यु, चिकुनगुन्या, हिवताप आजाराचा प्रार्दूभाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांचेमार्फत विविध भागात कंटेनर सर्वेक्षण करण्यात येत आहे. तथापि डेंग्यु ताप प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजने अंतर्गत लातूर शहर महापालिकेच्या वतीने आरोग्य कर्मचारी (पुरुष /स्त्री), आशा स्वयंसेविका मार्फत घरोघरी जावून सांडपाण्याच्या टाक्यांतील पाणीसाठयात डासअळींची उत्पत्ती झाली आहे का याची तपासणी करुन आरोग्य शिक्षण व आवश्यकतेनूसार अॅबेट टाकण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

# प्रभुराज प्रतिष्ठाण लातूरच्या वतीने वंचित व गरजू लोकांना पावसाळी मोसमात पावसापासून शरीर बचाव कवच वाटप!



**लातूर/प्रतिनिधी**

दिनांक २७/०६/२०२२ रोजी प्रभुराज प्रतिष्ठाण, लातूर वतीने पावसासपासून शरीर भिजू नये व त्यापासून आजार होऊ नये या करिता पावसाळी मोसमात गरजू व वंचित लोकांना पावसापासून बचावासाठी शरीर कवच (कुंची) वाटप करण्याचे उपक्रम हाती घेतला जेणे सध्या पावसाळी मोसमचे वातावरण वाडत असल्याने प्रत्येकजण पावसापासून शरीर भीजुनये व आजार होऊ नये याची काळजी घेत छत्री व शरीर भिजू नये या करिता पावसाळी कपडे परिधान करतात त्याच परिस्थिती लातूर शहरात बेघर आणि निराधार लोक कश्याचा तरी आसरा घेत निपुटपणे शरीर भिजून कुडकुडत बसलेले व झोपत असत पण त्यांचे ही पावसापासून बचाव व पाण्याचा सामना करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणने पुढाकार घेऊन वंचित लोकांना त्यांचे पावसाच्या पाण्यामुळे शरीर भिजू नये व आजारास सामोरे जाऊ नये या करिता मायेची चादर पांगरण्यात आली तसेच वंचित, गरजू लोकांचा शोध घेत त्यांची सेवा करण्याकरिता ते दिसून येताच सामाजिक बांधलकी जपून यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आणि जसे जमेल तसे सहकाऱ्याच्या साहाय्याने अंग कवच (कुंची) वाटप करून कर्तव्य निभावण्याचा प्रयत्न केला कोणी वेढ्याच्या परिस्थिती आढळून आले असता त्यांचे गैरवर्तणुक व छिडछिडेपणा ही सहन करत त्यांना आपल्यात सांभाळून घेत तेही मानव आहेत अशी भावना ठेवत त्यांनाही मदत केली.

यावेळी प्रभुराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष अँड.अजय कलशेट्टी, नंदा हमीने सौ.जमदाडे, डॉ. संजय जमदाडे, आजुभाऊ पल्लोड, हेमंत वडने, दत्ता ढगे, शाम मोरे, बंडापा जवळे, मोतीराम कदम, शिवाप्पा धुळे, शेख हुसेन, सुनील कोटलवार, आनंद जवळे, शिवा रोडे, मुन्ना बट्टेवार,दीपक प्रयाग, सौरभ कलशेट्टी, रवी घुगरे, अजिंक्य रेड्डी, राम डूमने आदीनि परिश्रम घेतले.

# भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाउंडेशन तर्फे पिंक ऑटो गटाच्या महिलांना रिक्षा घेण्याकरीता अग्रीम अग्रीम रकमेसाठी आर्थिक सहकार्य



**जळगाव/प्रतिनिधी**

गुलाबी रिक्षा चालवून महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात. कष्टकरी, गोरगरीब महिलांना ऑटो रिक्षा घेण्यासाठी लागणारी अग्रीम रक्कम देऊन भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाउंडेशनने त्यांचा जीवनमार्ग सोपा केला व त्यांच्या प्रगतीची नवी वाट खुली होणार आहे.' पिंक ऑटोरिक्षा महिला गटाच्या १५ सदस्यांना रिक्षा घेण्यासाठी भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाउंडेशनने अग्रीम रक्कमेसाठी आर्थिक सहाय्य केले. त्याचा छोटेखानी कार्यक्रम गांधी तीर्थला आज २८ रोजी पार पडला. त्यासाठी सौ. ज्योती जैन, गीता धरमपाल, सौ. अंबिका जैन आणि मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड. जमील देशपांडे, सचिव विजय वाणी, कुशल ऑटोमोबाईल चे विद्याधर नेमाने मराठी प्रतिष्ठानचे विश्वस्त संध्या वाणी, निलोफर देशपांडे डॉ.सविता नंदनवार उपस्थित होते. गेल्या तीन वर्षापूर्वी शहरात महिला, मुलींच्या सुरक्षीत प्रवासासाठी महिला ऑटोचालक असाव्या असा विचार पुढे आला. त्यासाठी मराठी प्रतिष्ठान तर्फे तीन वर्षा पूर्वी पाच महिलांना रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी शहरात पिंक ऑटो गटाची स्थापना करण्यात आली. १५ महिलांना रिक्षा चालविण्याच्या प्रशिक्षणासाठी कुशल ऑटोचे संचालक विद्याधर नेमाने यांनी सौजन्य केले. या सर्व महिलांचा जळगाव जनता बँकेत बचत गट असून त्या मार्फत सिंधु भरारी या योजनेअंतर्गत त्यांना रिक्षा घेण्यासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करण्यात आले आहे. ऑटो रिक्षा घेणाऱ्या त्या महिलांना डाऊन पेमेंट भरण्यासाठी अडचण होती. या बाबत जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांना सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी डाऊन पेमेंटसाठी सहकार्य केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.जमील देशपांडे यांनी केले तर आभार विजय वाणी यांनी केले.

# हिरेहब्बू वाड्यातून ग्रंथ व भांड्यांची चोरी दोघे संशयित पोलिसांच्या ताब्यात

**सोलापूर/प्रतिनिधी**

कवी राघवन यांनी लिहिलेला ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांवरील ग्रंथ व पूजेच्या भांड्यांची चोरी उत्तर कसब्यातील राजशेखर हिरेहब्बू यांच्या वाड्यात गुरुवारी रात्री झाली. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिसांनी दोघा संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांच्या कार्याविषयी कवी राघवन यांचा नऊ अध्याय असलेला सुमारे ४० पानांचा ग्रंथ हिरेहब्बू वाड्यात एका सागवानी पेटीमध्ये पूजेसाठी ठेवण्यात आला होता. गुरुवारी रात्री सव्वाअकराच्या सुमारास चोरट्यांनी वाड्यात प्रवेश करुन हा ग्रंथ तसेच पितळी दिवा, तांबा धातूच्या तांब्या असा ऐवज पळवून नेला. शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास सागर हिरेहब्बू हे पूजा करीत असताना चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या घटनेची माहिती हिरेहब्बू यांनी फौजदार चावडी पोलिसांना दिली. पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त (गुन्हे) बापू बांगर, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) डॉ. वैशाली कडूकर, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रीती टिपरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी सुरु असल्याचे सांगितले.

# गुरसाळे येथे जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक; हत्यारांसह ५५ हजारांचा ऐवज जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील गुरसाळे येथे बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढून घरात प्रवेश करून सुमारे ६८ हजारांचा ऐवज लुटून नेणाऱ्या दोघा चोरट्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ५५ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. याबाबत मोहन शंकर गायकवाड वय ६२ यांनी माळशिरस पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. ज्येष्ठ नागरिकांवर झालेल्या गुन्ह्याचे गांभीर ओळखून पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष लक्ष देऊन गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पथक नातेपुते भागात असताना तांत्रिक विश्लेषणावरून गुरसाळे येथील जबरी चोरीचा गुन्हा हा त्याच गावातील दोघांनी केला असून त्यातील एकास गावातून व दुसऱ्याच फलटण येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्यांनी गुन्हा केला असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याची विचारपूस केली असता त्यातील एका आरोपीचे फिर्यादीच्या घरी जाणे येणे होते. घरातील सर्व माहिती असल्याने त्यांनी सदरचे घर हेरून जबरी चोरीचा गुन्हा केली असल्याचे सांगून गुन्ह्यातील मंगळसूत्र, दोन मोबाईल गुन्ह्यातील कोयता आधी मुद्देमाल काढून दिला. पुढील तपास नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज सोनवलकर हे करीत आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अक्षय दळवी यांनी केली आहे.

# भिवंडीतील कारवली गावात अवैद्य गावठी दारूचा सुळसुळाट, उत्पादन शुल्क खात्याचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील खाडी किनारी भागात गावठी दारूच्या मोठमोठ्या भट्ट्या सुरू असून भिवंडी आणि ठाणे उत्पादन शुल्क खात्याचे मात्र अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. कारवली गाव आणि परिसरामध्ये जवळपास २५ ते ३० गावठी दारूच्या मोठमोठ्या खाडीकिनारी भट्ट्या असून या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याचे काम दारू व्यवसायातील अनिकेत म्हात्रे करत असल्याची माहिती सूत्राकडून मिळत आहे. यापूर्वीही मुंबईतील मालवणी गावठी दारू हत्याकांड व असे अनेक ठाणे आणि परिसरात गावठी दारू पिऊन व विषबाधा होऊन अनेक नवतरुण आणि नागरिकांचे प्राण गेले आहे, कित्येक नागरिक गावठी दारूच्या आहारी जाऊन आपले संसार उध्वस्त झाले आहे. अनिकेत म्हात्रे हा भिवंडी शहर आणि भिवंडीतील ग्रामीण भागात गावठी दारू सप्लायर म्हणून काम करत आहे. भिवंडी आणि ठाणे उत्पादन शुल्क खात्याशी अर्थपूर्ण सबंध असल्यामुळे त्याच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात येत नाही.

भिवंडी पोलीस विभाग यांनी वेळोवेळी कारवाई करून सुद्धा हा प्रकार बंद होत नाही. भिवंडी ठाण्यातील सर्व उत्पादन शुल्क खाते माझ्या खिशात आहे. माझे कुणीही काही करू शकत नाही असे जाहीरपणे अनिकेत म्हात्रे बोलत आहे. आणि वावरत आहे. त्यामुळे हजारो निष्पाप नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या आणि अनेक कुटुंबांना देशोधडीला आणि उद्ध्वस्त करणाऱ्या या गावठी दारूच्या अड्ड्यावर कारवाई व्हावी तसेच उत्पादन शुल्क खात्याच्या आशीर्वादाने आपले गावठी दारूचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या अनिकेत म्हात्रे यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी कारवली गावातील भिवंडी शहरातील सर्वसामान्य नागरिक आणि महिलांनी केली आहे.

# अंबरनाथ विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे बंडखोर आमदार डॉ.बालाजी किणीकर यांना जीवे मारण्याची धमकी

**अंबरनाथ/सुनील तांबे**

एकनाथ शिंदे गटात सामील असलेले शिवसेनेचे बंडखोर आमदार डॉ. बालाजी किणीकर यांना गोळी घालून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार बालाजी किणीकर यांना धमकीचे निनावी पत्र पाठवल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून बंडखोर आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असतानाच किणीकर यांना ठार मारण्याची



धमकी दिल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्क वितर्कांना उधाण आलं आहे. एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर अंबरनाथचे शिवसेना आमदार डॉ. बालाजी किणीकर हे देखील त्यांच्यासोबत गुवाहाटीला गेले आहेत. अंबरनाथमध्ये आमदार किणीकर यांना आज एका अज्ञात इसमाने पत्राद्वारे धमकी पत्र पाठवलं आहे. याबाबत किणीकर यांचे ऑफिस क्लार्क प्रकाश भोगे यांनी अंबरनाथ मधील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात या धमकी निनावी पत्राबाबत महिती देऊन तक्रार अर्ज सादर केलाय. या पत्रात सदर इसमाने त्यांना गोळी मारून ठार असल्याची धमकी दिली आहे. या पत्रातील मजकूर आमदार बालाजी तेरे को गोली मारने का दिन आ गया है, हमारे अंबरनाथ के शिवसेना नेता को तकलीफ देता है इसी लिए तुझे मारने का है।

04 TO 10 JULY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 02/07/2022 8:26 PM Page 1



## तोतया पोलिसांच्या चौकडीने महिलेला घातला गंडा, सोन्याचे दागिने घेऊन पसार

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रातील नारपोली व कोनगाव पोलीस ठाणे हद्दीत ठाणे बायपास रस्त्यावर मागील तीन महिन्यात २० हुन अधिक तोतया पोलिसां कडून लुटीच्या घटना घडल्याने पोलीस यंत्रणेची डोकेदुखी वाढली असताना या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या महिलांच्या छातीत धडकी भरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार मानकोली रोड एटगे राहणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षिका मनीषा मंगेश खातू या आपल्या पतीसोबत दुचाकी वरून भिवंडी येथील बँकेत चौकशी करण्यासाठी निघाल्या असता. बायपास रस्त्यावरील टाटा आमंत्रा येथे पोहचले असता दुचाकी वरून आलेल्या दोन इसमांनी त्यांची गाडी थांबवुन आम्ही पोलीस आहोत असे सांगून ओळखपत्र दाखविले व पुढे चोरी सारखा प्रकार झाला आहे, तुम्ही दागिने काढुन ठेवा असे सांगितले. त्याच सुमारास या भामट्यांचे दोन साथीदार येऊन त्यांनी या महिलेस आम्ही सुध्दा दागिने काढून दिल्याचे सांगितल्याने महिलेने आपल्या हातातील चार सोन्याच्या बांगड्या या तोतया पोलिसांच्या हाती देऊन कागदात गुंडाळून महिलेच्या हाती देताना बनावट बांगड्या असलेली कागदी पुडी महिलेच्या हाती देत चार ही भामटे दोन वेगवेगळ्या दिशेने पसार झाले. या प्रकरणी फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त शिक्षिका असलेल्या महिलेने कोनगाव पोलिसांकडे तक्रार दिल्याने चार तोतया पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉक्टर दिनानिमित्त डॉ. सुनिल भडांगे आणि डॉ. माधुरी कांबळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त अभ्यास ॲकॅडमी येथे डॉक्टरडे साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

लोकांच्या आरोग्याच्या संबंधित सर्व समस्यांचे इलाज डॉक्टरांकडे उपलब्ध असतात. म्हणून डॉक्टरांना देवाचा दर्जा दिला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेण्यासाठी १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त अभ्यास ॲकॅडमी येथे डॉक्टरडे साजरा करण्यात आला. या वेळी वाडा ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. सुनिल भडांगे आणि निवा हॉस्पिटलच्या डॉ. माधुरी कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. डॉक्टरांचे महत्व तर आहेच मात्र कोरोनाकाळात याचे महत्व अधिकच वाढले. अनेक डॉक्टरांनी आपल्या जीवाची बाजी लावत रुग्णांची सेवा केली. वाडा ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. सुनिल भडांगे यांनी देखील कोरोनाकाळात चांगले काम करून कोरोनाचा मुकाबला केला होता. तसेच स्त्री रोगतज्ञ डॉक्टर माधुरी कांबळे यांचे देखील आरोग्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील काम अतिशय वाखान्य जोगे आहे. या डॉक्टरांच्या अनुभवाचा फायदा भावी पिढीला व्हावा या उद्देशाने १२वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. माधुरी कांबळे यांनी आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी मेहनत करण्याचा सल्ला दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. कांबळे यांचा सत्कार केला.

## पोलीस उपनिरीक्षकाला १२ हजार लाच घेताना रंगेहाथ अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सदर बझार पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षकाला १२ हजार रुपये घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूरच्या पथकाने सोलापूर रेल्वे पोलीस चौकीतच रंगेहात पकडले. प्रशांत सुर्यकांत क्षीरसागर वय ३४ वर्ष, पद- पोलीस उपनिरीक्षक नेमणूक- सदर बझार पोलीस स्टेशन अंतर्गत रेल्वे स्टेशन पोलीस चौकी,असे अटक करण्यात आलेल्या पोलिसाचे नाव आहे. यातील तक्रारदार तसेच त्यांचे ओळखीचे काही इसम यांच्या खाजगी गाडया असुन त्यांनी सदर गाडया प्रवासी वाहतुकी करिता रेल्वे स्टेशन पोलीस चौकी परिसरात उभ्या करतात. यातील आलोसे प्रशांत सुर्यकांत क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक नेमणूक सदर बझार पोलीस स्टेशन अंतर्गत रेल्वे स्टेशन पोलीस चौकी, सोलापूर शहर यांनी तक्रारदार तसेच त्यांच्या ओळखीच्या इसमाच्या गाडयांवर कोणतीही कारवाई न करण्याकरिता मासिक हप्ता स्वरुपात १३,००० रुपयांची मागणी करून तडजोडी अंती १२,००० रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाच रक्कम रेल्वे स्टेशन चौकी सोलापूर येथे स्वतः स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरची कारवाई चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, एसीबी सोलापूर पोलीस अंमलदार, पोह शिरीषकुमार सोनवणे, पोना श्रीराम घुगे, पोना अतुल घाडगे, पोना प्रमोद पकाले, पोकों उमेश पवार, पोकों शाम सुरवसे सर्व नेमणूक एसीबी, सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

पान १ वरून...

## बायकोच्या चिथावणीने नातवाचे...

होत्या. दिवसभर त्या कामात व्यस्त असल्याने घरी दुपारी जात नव्हत्या. रात्री ही उशिराच घरी जात होत्या. याला कारण म्हणजे त्याचे नात सुनबरोबर पटत नव्हते. नात सुन ही त्याचेबरोबर कशाचे ही निमित्य करून भांडत होती. त्यामुळे त्या घरी कमीच राहत होत्या. फक्त रात्री झोपण्या पुरतेच त्या घरी जात होत्या. त्याच्या दोन्ही मुली कधी कधी भेटायला या त्या कामाच्या ठिकाणीच जात होत्या. शहानवाज हा आपल्या पत्नीची बाजू घेवून आजी रजिया यांना बोलत होता. तो कधीच त्याचे म्हणणे ऐकून घेत नव्हता. रजिया याचे वय झाल्याने त्यांना कौटुबिक त्रास सहन होत नव्हता. त्यातच त्या शेजारपाजाऱ्यांना आणि भेटायला येणाऱ्यांना नात सुन ही बरोबर नाही, ती काम व्यवस्थीत करीत नाही,तिचे बाहेर कुठल्या तरी परपुरुषाबराबर लफडे चालु आहे असे सांगत होत्या. आपली आजीच आपल्या पत्नीची बदनामी करत आहे या कारणातून शहानवाज ही तिच्याबरोबर भांडत होता. आजी ही त्याला तु तुझ्या बायकोचेच ऐकणार तु बायकोचा बैलभाडया झाला आहेस असे म्हणत होत्या. त्यामुळे तो आजीवर चिडत होता या कारणातून त्याचे घरात दररोज भांडणे होत होती. रजिया याचे स्वत:चे घर होते. त्यामुळे ते नातवाला आणि नात सुनेला भांडणात माझ्या घरातून बाहेर पडा असे सांगत होत्या. त्यातच रजिया याच्या मुलीही शहानवाज याला नावे ठेवून आपल्या आईला त्रास देवू नकोस, ती काही तुमच्या जीवावर जगत नाही. तिच्या पोटापुरते ती काम करते. त्यामुळे तिला त्रास देवू नकोस असे सांगत होत्या. पण घरात नात सुन आणि आजी असल्या की कायम भांडणे होत होती. ही भांडणे विकोपाला गेली होती. भांडणात शहानवाज याची पत्नी त्याला तुमच्या आजीला सांगा नाही तर मी माझ्या माहेराला निघून जाते तुम्ही सांभाळा, तुमच्या आजीला आणि मुलांना. म्हातारी माझी बदनामी करून मलाच नावे ठेवते मला तिच्या सोबत राहयचे नाही असे म्हणून शहानवाज याला घर सोडून जाण्याची धमकी देत होती. दोघीच्या भांडणात त्याची गोची होत होती. आजी रजिया शेख या समाजावून सांगून ही ऐकत नव्हत्या. उलट ओळखीच्या आणि नातेवाईकांना त्या नात सुनेबाबत सांगून ती बाहेरख्याली वागते तिचे संसारात लक्ष नाही म्हणून माझी मी कामाच्या ठिकाणी येवून बसते असे सांगून आपलेच रडगाणे सांगत होत्या.गेल्या दोन चार महिन्यात घरची भांडणे विकोपाला गेली होती.त्यामुळे शहानवाज याला इकडे आड तिकडे विहिर असे झाले होते. त्याचे ही कामात लक्ष लागत नव्हते. काय केले म्हणजे यातून मार्ग निघेल याचा तो विचार करीत होता. त्याने आता आपल्या आजीलाच कायमचे संपवायचे म्हणजे आपला मार्ग मोकळा होईल असे त्याला वाटत होते. शनिवार दि.२५ रोजी चौथा शनिवार असल्याने जिल्हाधिकारी कार्यालय बंद होते. तरी ही रिजया शेख या नेहमी प्रमाणे पहाटे ५ वाजता उठून दर्गाला गेल्या तेथून ६ वाजता परत येवून त्या आपल्या कामाच्या ठिकाणी आल्या. त्या झाडलोट करीत असताना तेथे शहानवाज आला. त्याने कामात असणाऱ्या आपल्या आजीला म्हणाला की, पडक्या इमारतीच्या आतून माती आणूया आपल्या घर दुरूस्तीला माती लागणार आहे. त्याने असे म्हटल्यावर आजी रजिया शेख या शहानवाज बरोबर बाजुच्या पडक्या इमारतीत माती आणण्यासाठी गेल्या. त्या खाली वाकून माती काढीत असताना शाहनवाज याने बाजुलाज पडलेला एक कौल उचलला आणि आजी रजिया शेख याच्या डोक्यात जोराने हाणला.त्या सरशी त्या जोरात ओरडत खाली पडल्या. त्याचे डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला होता.त्यानंतर त्याने स्क्रु ड्रायव्हरने त्याच्या मानेवर त्याने वार केला. त्या तडफडत खाली पडल्या असताना त्याने परत त्या स्क्रु ड्रायव्हरने पोटात भोसकले. त्यासरशी त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच तो तेथून पसार झाला. इकडे सकाळी कामावर गेलेली आपली आई संध्याकाळ झाली तरी घरी परत आली नाही म्हणून शहानवाज याने आपल्या आतीना बोलावून आजी घरी परत आली नसल्याचे सांगून तिचा शोध घेवूया म्हणून सांगितले.तो फक्त त्याचेबरोबर आजीचा शोध घेण्याचे नाटक करीत होता. शोध घेवून ही त्या सापडत नसल्याने व रजिया शेख याचा मोबाईल ही बंद येत असल्याने त्याच्या मुलीना त्याची काळजी वाटत होती. म्हणून त्यांनी सदर बाजार पोलीस स्टेशन गाठून आपली आई रजिया शेख (वय ७२) या बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलीस ही त्याचा शोध घेत होते. दुसऱ्या म्हणजे रविवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयातील एक शिपाई त्या पडक्या इमारतीत गेला असता त्याला दुर्गंधी येत असल्याने त्याने आत जावून पाहिले असता त्याला रजिया शेख या मृतावस्थेत दिसून आला. त्याच्या अंगावर मारहाणीच्या जखमा होत्या. त्याच्या शरीरातून रक्तस्त्राव झाल्याचे दिसत होते.त्याने या घटनेची माहिती मयत रजिया शेख यांच्या नातेवाईकांना बोलावून सांगितले. घटनास्थळी नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती.या घटनेची माहिती सदर बाजार पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोलीस उपायुक्त बापु बांगर,सहायक पोलीस उपायुक्त डॉ.प्रिती टिपरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, दुय्यम पोलीस निरीक्षक पोपटराव घायतोंडे यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथक मागविले होते. ते श्वान ही दर्गाया पर्यत जावून परत खून झालेल्या पडक्या इमारतीत परत आले होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी सोलापूरच्या शासकीय रूग्णालयात पाठवून दिले. घटनास्थळी मयत रजिया शेख यांच्या मुली आणि नातू शाहानवाज शेख हे रडत होते. त्यातच पोलीसांना मोठमोठयाने रडणाऱ्या शाहनवाज शेख याचा संशय येत होता. पोलीसांनी संशयावरून त्याचेकडे चौकशी करयाला सुरूवात केली असता त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती. तो नाटक करीत असल्याचे पोलीसांनी ओळखले आणि त्याला संशयावरून ताब्यात घेवून त्याचेकडे आजी रजिया शेख याच्या विषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत रजिया शेख ही नात्याने त्याची आजी लागत होती. कौटुंबिक भांडणात ती आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला बदनाम करीत होती. त्यातून रोजची भांडणे होत असल्याने आपणच शनिवार दि.२५ रोजी आजीला माती आणण्याचे निमित्य करून पडक्या इमारतीत नेवून तिला मारून टाकल्याचे सांगितले. मयत रजिया शेख याच्या मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी रजिया सलीम शेख (वय ७२)याच्या खून प्रकरणी नातू शाहनवाज मेहबूब शेख (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला १० दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला स्क्रु ड्रायव्हर जप्त केला. या घटनेचा तपास वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, अश्विनी भोसले, स.पो.नी.संजय क्षीरसागर यांनी केला. म्हातारपणात काही माणसे विचारांनी भरसटलेली असतात. त्याचे घरातील कोणाशीच कधी पटत नसते त्यातूनच घरात भांडणे होत असतात.मयत रजिया शेख यांनी ही आपल्या नात सुनेची बदनामी न करता झाकली मुठ ठेवायला पाहिजे होती. पण तसे न करता त्या नात सुनेला बदनाम करीत होत्या. तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याबरोबर आणि नातवासोबत भांडत होत्या. त्यातून भांडण विकोपाला गेल्यावर नातवानेच त्याचा घात केला. हेच या घटनेवरून दिसून येते.

## गरीब अल्पवयीन मुलगी आयुष्यातून...

अल्पवयीन मुलगी गर्भवती झाल्यावर या नराधमांचा भांडाफोड झाला. या प्रकरणी सायखेडा पोलीस ठाण्याला गुन्हा दाखल होताच पोलिसांनी दोघा साश्रमांच्या मुसक्या आवळून त्यांना गजाआड केले. निफाड तालुक्यातील खेरवाडी येथे समाधान राजीराव संगमनेरे (२५) हा तरुण रहात होती. समाधान गुंड प्रवृत्तीचा असल्याने गावात त्याच्याबद्दल कोणी चांगले बोलत नव्हते. वाईट माणसाच्या संगतीला वाईट माणूसच लागतो. त्याप्रमाणे समाधानचा मित्र होता संतोष. संतोष उर्फ पिंटू केदू उर्फ बकुळे (वय ४५) हा मुळचा खेरवाडी गावचाच आहे, पण तो सध्या दिंडोरी (ता. दिंडोरी) येथील निळवंडी रोड परिसरात राहतो. त्याचे खेरवाई येथे नेहमी येणे-जाणे असते. समाधान व संतोष या दोघांच्या वयात मोठी तफावत होती, तरी काम-धंद्याच्या निमिताने व एकाच गावातील राहणारे असल्याने त्याच्यामध्ये मैत्री निर्माण झाली होती. त्यामुळे संतोष खेरवाडी येथे आला की समाधान सोबतच गावात फिरत असते. गुड प्रवृत्तीचे असल्याने त्यांच्याकडून कोणी काही चांगली अपेक्षा केली नव्हती उडाणटप्पुसारखे फिरणाऱ्या समाधान, संतोषला गावात काडीचीही किंमत नव्हती. गावात सोबत फिरत असतांना गावात रहाणाऱ्या एका २३ वर्ष ५ महिने असलेल्या अल्पवयीन मुलीवर या नराधमांची नजर पडली आणि त्यांची नियत फिरली. एकाच गावात राहणारे आणि तीही त्या दोघांना चांगल्याप्रकारे ओळखत होती. त्यामुळे बोलणे चालणे होते. मुळातच ती मुलगी लहान होती. अजाण होती. तिला लोकांच्या वाईट नजरेची जाण नव्हती. आपल्याबद्दल आपल्या बापाच्या वयाचा माणूस घाणेरडा विचार करु शकतो हे समजण्याचे तिचे वयही नव्हते. ती मोठ्या माणसांशी आदराने वागावे तशीच २५ वर्षाच्या समाधान आणि ४५ वर्षाच्या संतोषसोबत वागत होती. त्यांच्या मनात मात्र वासनेचा संतान वैमान घालू लागला होता. नुकत्याच वयात आलेल्या या मुलीच्या कोवळ्या शरीराचे लचके तोडण्याचा विचार ते नराधम करत होते. त्यांना कशाचीच लाज अली नव्हती. काम-धंद्याच्या निमित्ताने या मुलीचे आई-वडील घराबाहेर असतात. ती एकटी घरात असते हीच संधी साधून तिच्या शरीराचा उपभोग घ्यायचा असा कुटील डाव समाधान व संतोष या दोघानी रचला. दोघे जण तिचा उपभोग घ्यायला आतुर झाले होते. त्यांना तिच्याकडून बळजबरीने शारिरीक सुख ओरबाडून घ्यायचे होते, त्यासाठी ते सतत तिच्या घरावरून फेल्या मारू लागले. तिचे आई-वडील घराबाहेर गेल्यानंतर केव्हा घरी परततात यावर लक्ष ठेवू लागले आणि हे दोघे तरुण चासनेने पछाडले असून संधीची वाट पाहू लागले. काम-धंद्याच्या निमित्ताने घराबाहेर पडलेले तिचे आई वडील सायंकाळी खूप उशीरा घरी परत येत असल्याचे दोघांनी हेरले आणि सायंकाळी तिच्या घरी जावून डल्ला मारण्याचे दोघांनी ठरवले. त्याप्रमाणे त्यांना संधी चालून आली. फेब्रुवारी २०२२ च्या महिन्यात सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास समाधान व संतोष असे दोघे जण तिच्या घराजवळ आले. ती मुलगी घरात एकटी असल्याची त्यांनी खात्री केल्यानंतर समाधान पूर्वतयारी करण्यासाठी या मुलीच्या घरात घुसला. घरात गेल्यावर त्याने आतून दरवाजाची कडी लावन घेतली. काय चालले आहे हे कळण्याआधीच त्याने तिला चाकूचा धाक दाखवला. ती इतकी घाबरली की तिच्या तोंडून शब्दच बाहेर पडत नव्हते. त्याने तिचे तोंड दाबून तिला अंगावरील कपडे काढण्यास भाग पाडले. तिचे कोवळे शरीर त्याच्यासमोर पूर्ण नग्न होते. ते पाहन जास्तच चेकाळला. त्या नराधमाने त्या कोवळ्या पोरीवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. त्याच्या शरीरावर तो अधाशासारखा तुटून पडला. तिच्या कोवळ्या देहाचे लचके तोडत तिच्यावर बलात्कार करण्यासाठी तयार झाला. ती रडत होती, विनवण्या करत होती, पण तो काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार करून बळजबरीने शारिरीक सुख ओरबाडून घेतले. वासना शांत करून तो बाजूला झाला. त्याने त्याचा डाव साधला होता. एका कोवळ्या अजाण पोरीच्या शरीरावर, मनावर अत्याचार करून नराधमाने विकृत असुरी आनंद लुटला. तिची अब्रु गेल्याने ती रडत होती. मात्र त्याला तिची दया आली नाही. त्याने तिला धमकावले, तू जर याबाबत कोणाला काही सांगितले तर तुझ्या भावाला मारून टाकेन. तुझी तुझ्या शाळेत बदनामी करेन. या धमकीने ती अजाण पोरगी तोंड मिटून अश्रू गाळू लागली. आपला कार्यभार उरकल्यानंतर समाधान घराबाहेर पडला. बाहेर संतोष उर्फ पिंटू दबा धरून बसला होता. समाधानने घरातून बाहेर येताच त्याला इशारा केला. मग संतोषही आजूबाजूचा अंदाज घेऊन घरात घुसला. आधीच्या अत्याचाराने ती गर्भगळीत होऊन पडली होती. तिच्या देहावर त्याने ताबा घेतला. तिच्या कोवळ्या शरीराला कुस्करू लागला. तिचे काहीच चालत नव्हते. तिच्या रडण्याने, ओरडण्याने त्या विकृताला जास्तच आनंद मिळत होता. त्याची ताकत वाढत होती. त्यानेही आपल्या मुलीच्या वयाच्या मुलीवर जबरदस्तीने बलात्कार केला. वासना शांत झाल्यानंतरही तिला धमकी देऊन तो पसार झाला. दोघांनी तिच्यावर आळीपाळीने पाशवी बलात्कार केल्याने तिला खूप यातना झाल्या. या यातना ती कशातरी सहन करत होती. सायंकाळी उशिरा तिचे आई वडील घरी आल्यावरसुद्धा ती मूग गिळून बसली. समाधान याने दिलेल्या धमकीमुळे ती घटना तिने कोणालाही सांगितली नाही. मात्र निसर्ग काही थांबायला तयार नव्हता. त्याची किमया मुख्य होती आणि ती गर्भवती झाल्याची लक्षणे तिच्या आई-वडीलांना दिसू लागली, तेंव्हा त्यांनी तिला याबाबत विचारणा केली असता समाधान व संतोष उर्फ पिंटू या दोघांनी आपल्यावर अत्याचार केल्याची माहिती दिल्यावर त्यांचे घाबे दणाणले. त्यांनी मुलीला सोबत घेवून सिव्हील हॉस्पिटल गाठल्यावर या अत्याचाराचा भांडाफोड झाला. वैद्यकीय सूत्रांनी या घटनेची माहिती सायखेडा पोलीस ठाण्यावर कळवली. पोलिसांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये जावून तिचा जबाब नोंदवला. त्यानंतर सायखेडा पोलीस ठाण्याला गुन्हा रजि. नं. ८६ / २०२२ ला आरोपी समाधान बाजीराव संगमनेरे (वय २५) आणि संतोष उर्फ पिंटू केदू उर्फ केरू बेंडकुळे (वय ४१) या दोघा जणांविरोधात भा.दं.वि. ३७६ (ड), (अ), ४५२, ५०६, ३४ व लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक सचिन पाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पी. वाय. कादरी यांनी हवालदार उत्तर तलोरे, पोलीस नाईक सुनिल भाबड, कॉन्स्टेबल प्रकाश वाकळे, मदन कहांडळ, महिला पोलीस नाईक उर्मिला बिस्ट यांच्या मदतीने तपासाला सुरुवात केली. समाधान संगमनेरे याला खेरवाडी गावात तर संतोष उर्फ पिंट याला दिडोरी येथून ताब्यात घेवून दोघांना अटक केली आहे.

पान ८ वरून....

## मातृभाषेतून घेतलेले शिक्षण सर्वोच्च...

यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे नूतन कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशात व जडणघडणीत शिक्षकांची मेहनत व एकीचे बळ ही भूमिका महत्त्वाची आहे, असे मत व्यक्त केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष जितेश चापसी यांनी राष्ट्रभक्ती व संस्काराचे धडे देत विकास साध्य करणारी व सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था म्हणजे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर सूत्रसंचलन श्रीमती राजश्री कुलकर्णी व श्रीमती वैशाली फुलसे यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील वसमतकर यांनी केले.संतोष बीडकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सुनील वसमतकर, कार्यक्रम प्रमुख बालासाहेब केंद्रे, सहप्रमुख बबनराव गायकवाड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी राजारामपंत बिलोलीकर, ॲड. विश्वनाथ जाधव, ॲड.जगन्नाथ चिताडे, माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी...

मिळावी अशा विविध मागण्यांसाठी कुणबी सेना प्रमुख विश्वनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाडा तहसील कार्यालया समोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. तर दुपारच्या सुमारास कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील यांच्यासह परशराम सावंत, डॉ.विवेक पाटील, विठ्ठल गोरे, अविनाश पाटील, आत्माराम भोईर, विष्णू पाटील, प्रल्हाद शिंदे, नितीन पाटील, राजेश रिकामे यांनी तहसीलदार यांच्या दालनात तहसीलदार डॉ.उद्धाव कदम यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांनबाबत चर्चा केली. यावेळी शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## विषमता हा विकासातला अडसर ...

आवाज या शोध ग्रंथातून केले आहे.त्याचे राजकीय व सामाजिक क्षेत्राने अवलोकन केल्यास विकासाचा परिघ विस्तारण्यास मदत होणार आहे, असेही ते म्हणाले. शिक्षणाच्या संधी निर्माण करुन देवून लोकराजांनी सामाजिक न्याय केला, असे मत अध्यक्षीय समारोपात प्रभाकर कापसे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वाचनालयाचे सचिव बी.जी. होळीकर यांनी केले. उपाध्यक्षा कल्पना गायकवाड यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी ग्रंथपाल अंजुषा काटे, लिपीक संकेत होळीकर, विठ्ठल गुरमे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला वाचक आर.एन. खाडप, आत्माराम गिरी, भीम गडेराव, लेखापाल एन.व्ही. गायकवाड, पत्रकार हरी गोटेकर, बालवाचक गौरी शिंदे, नंदिनी पळपुटे, स्मिता शिंदे, जान्हवी जावळे, अक्षरा कदम, समर्थ शिंदे, मनोज शिंदे, राज गुरमे, वेदांश पाडे, प्रशांत गुरमे, श्रावणी शिंदे आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी...

कोकण विभाग ठाणे अंकुशजी माने, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी पालघर दिलीप नेरकर, कृषिउप संचालक तथा उप विभागीय कृषि अधिकारी वाडा नरेंद्र आघाव, तालुका कृषि अधिकारी पालघर तरूण वैती साहेब, सुनिल पारधी व कृषि विभाग वाडा तालुका कृषि अधिकारी एस.पि.इंगळे आदी उपस्थित होते.

## माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक ...

प्रल्हाद राठोड, लक्ष्मण जाधव, कार्यक्रमाला यांची प्रमुख उपस्थिती लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रवक्ता राष्ट्रीय बंजारा टायगर्सचे राजेश राठोड, RBTचे तालुका अध्यक्ष दिनेश राठोड, RBT तालुका उपाध्यक्ष विजय चव्हाण, RBT सल्लागार अमरसिंह चव्हाण, उमेश राठोड, नाना जाधव, दिनेश पवार, भोजराज चव्हाण, पंढरीनाथ (पप्पू) जाधव, जितु जाधव, लहू जाधव, सुरेश राठोड, सुदाम राठोड, मिथुन राठोड, महादेव जाधव व इतर कार्यकर्त्यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वाड्यातील प्रशिक्षण हॉल...

करण्यात आले. यावेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माधुरी कांबळे, निहेश गायकवाड, संजय कामडी, आदि मान्यवरांसह विविध क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते.

## गावठी कट्टा व जिवंत काडतुसह...

ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास चौगुले, पोलीस निरीक्षक, गुन्हे, महेंद्र शेलार व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनिरी. सुनील पाटील, पोहवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना. प्रताप पाचुंदे, पोअं. संदीप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

## शेती हाच अन्नाचा प्रमुख आधार...

आत्मा चे संचालक दशरथ तांबाळे, डाळींब संशोधन केंद्रांचे डॉ.अमृतसागर, आत्माचे सहसंचालक मदन मुकणे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी शेतकरी बांधवांचा बीयाणे व वृक्ष देऊन त्यांचा गैर करणेत आला. विस्तार अधिकारी सचिन चव्हाण यांनी स्वागत केले. जिल्हा कृषी अधिकारी कुंभार यांनी आभार मानले.

# गोवानिर्मित अवैध मद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई



**लातूर/प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त मा. कांतीलाल उमाप, संचालक सुनिल चव्हाण, मा.जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी दिलेल्या आदेशानुसार व मा.विभागीय उप आयुक्त प्रदिप एच.पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हयातील अधीक्षक अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक, लातूर यांच्या स्टाफने यांनी उड्डाण पुलाजवळ, बार्शी रोड जि. लातूर या ठिकाणी दिनांक २०/६/२०२२ रोजी एक दुचाकी ऑक्टीव्हा स्कुटी क्र. एम.एच.२४-२२३२ वर अवैध वाहतूक करित असतांना २ बॉक्स गोवा निर्मिती विदेशी मद्य जप्त करण्यात आले, पकडलेल्या आरोपीना चोकशी केली असता सदर अवैध मद्य में हॉटेल अजिंक्यतारा येथे घेवून चालल्याच्या सांगण्यावरुन सदर हॉटेलवर छाप टाकला असतो. सदर ठिकाणी एकूण १३ बॉक्स गोवाराज्य निर्मित विदेशी मद्य आढळूण आले. तदनंतर गुन्हयाच्या पुढील तपासात आरोपीच्या सांगण्यावरुन बसवंतनगर, जि. लातूर येथे महद्येमाल लपविल्याचे कळल्यावरून तेथे राहते जागेत छापा टाकला असता त्या ठिकाणी ५० बॉक्स गोवा राज्य निर्मित अवैध मद्य तसेच सदर गुन्हयात वापरण्यात आलेली एक मारुती व्हॅन क्र. एम एच-२६-८७६० जप्त करण्यात आली. त्याच गुन्हयाच्या तपासात मो. बोरगांव काळे, ता. जि. लातूर येथील एका शेतात छापा मारला असता त्या ठिकाणी २० बॉक्स गोवा राज्य निर्मित अवैध विदेशी मद्य मिळूण आले तसेच एका आरोपीच्या घरी म्हाडा कॉलनी, लातूर, ता. जि. लातूर येथे १० बॉक्स गोवा राज्य निर्मित अवैध मद्य तसेच गुन्हयात वापरलेली एक होंडा शाईन दुचाकी क्र. एम एच-२४-ए के १३४७ जप्त करण्यात आले. सर्व मिळूण एकूण ९५ बॉक्स गोवा राज्य निर्मित अवैध मद्य तसेच वरील नमुद एक चारचाकी व दोन दुचाकी वाहन जप्त करण्यात आले त्यापैकी गोवा बनावटीच्या जप्त अवैध विदेशी मद्याची किंमत ४ लाख ९० हजार रुपये व गुन्हयात वापरलेल्या जप्त वाहनाची किंमत १ लाख ९० हजार रुपये बाटली, बुचे, बॉक्स असे साहित्य असा एकूण ६ लाख ८० हजार रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हा क्र. १२०/२०२२ दि. २०/६/२०२२ अन्वये, महेश भागवत शिंदे, रा. सिताराम नगर, लातूर, दिनेश रामकिशन शिंदे, रा. सिताराम नगर, लातूर, योगेश आत्माराम सांडवे, रा. साई रोड, लातूर, जयराम आश्रुबा पांडे, रा. बसवंतपुर, जि. लातूर, अनिल हणमंत जाधव, रा. बोरगांव बु. ता. जि. लातूर, सोमनाथ नारायण पकाले, रा. कोल्हे नगर, लातूर या आरोपीना अटक करण्यात आली. यामध्ये बब्रुवान रामराव सुर्यवंशी हा आरोपी फरार आहे. सदर कारवाईमध्ये अधीक्षक अभिजित देशमुख, लातूर निरीक्षक आर. एम. बांगर. दुय्यम निरीक्षक एल. बी. माटेकर, अमोल शिंदे. सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गाल, जवान अनिरुद्ध देशपांडे, हनुमंत मुंडे, संतोष केंद्र, सुरेश काळे. श्रीकांत एस. साळुंके यांनी सहभाग नोंदविला. पुढील तपास निरीक्षक आर. एम. बांगर हे करित आहेत. अवैध मद्यविक्री विराधात कारवाई यापुढेही चालू राहणार असून, अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री ८४२२००११३३ क्रमांक व या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणा-याचे नांव गुप्त ठेवले जाईल असे अभिजित देशमुख, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

# आरटीओ चेक पोस्ट जवळील महामार्गावरील सिमेंट आणि बॅरिगेटरमुळे वाहतुक धोकादायक



**सोलापूर/प्रतिनिधी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सोलापूर विजयपूर महामार्ग क्रमांक १३ नांदणी येथे आरटीओ चेक पोस्ट जवळील रस्त्यावर आरटीओने त्या महामार्गावर सिमेंटचे मोठे स्टॅण्ड आणि फायबरचे बॅरिगेटर लावल्याने त्या रस्त्यावरून मोटारसायकल आणि विनावजनाच्या गाड्याना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे त्या ठिकाणी अनेक वाहने त्या सिमेंट कॉलम ला धडक देऊन वाहनांचे नुकसान देखील झालेले आहे. आणि महामार्गावर असे अडथळे निर्माण करणे चुकीचे आहे तरी लवकरात लवकर त्या महमार्गावरील लावलले बॅरिगेटर तात्काळ काढून टाकण्यात यावी अशी मागणी संतप्त वाहन धारकमधून होत आहे.त्यामुळे या अगोदर देखील अनेकदा त्या ठिकाणी भांडणे देखील झालेली आहे. तरी लावलेली बॅरिगेटर काढून टाकण्यात यावी किंवा ते रस्ता कायमस्वरूपी बंद करून आरटीओ च्या कमानीतून सोडण्यात यावी अशी मागणी होत.त्यामुळे त्याठिकाणी कार्यरत असलेल्या दोंन ते तीन शिफ्ट मध्ये काम करणारे कामगाराना वाहनधारकांकडून फुकटचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी याकडे आरटीओ अधिकारी याकडे लक्ष वेधून सदर अडथळे दूर करून वाहनधारकांना दिलासा देण्यात यावी.अन्यथा वाहनधारक आणि सामाजिक कार्यकर्ते यांना रस्त्यावर उतरावे लागणार आहे.

# घरफोडीतील आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त



**भिवंडी/अभिजित हिरे**

नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे घटना २४ जून रोजी घडली होती. या घरफोडीत घरातील १२ तोळे सोन्याचे दागिने असा जवळपास ४ लाख ९३ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. या गुन्ह्याचा तपस नारपोली पोलिसांसह भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस करत होते.या घरफोडीतील चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. या चोरट्याकडून घरफोडीतील मुद्देमाल देखील पोलिसांनी जप्त केला आहे.

निलेश संतोष जाधव वय २२ वर्षे काटई गाव असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव असून त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली त्याने चोरी केलेले १२ तोळे सोन्याचे दागिने ज्याची किंमत ४,९३,३५० असून हा मुद्देमाल जप्त करून आरोपीस नारपोली पोलीस स्टेशनचे ताब्यात दिलेले आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांचे देखरेखीखाली सपोनि विजय मोरे, सपोनि प्रफुल्ल जाधव, सपोनि धनराज केदार, पोउपनिरी रमेश शिंगे, सपोउनि रविंद्र पाटील, सपोउनि राजेंद्र चौधरी, पोहवा देवानंद पाटील, पोना साबिर शेख आदींच्या पथकाने केली असल्याची माहिती गुन्हे शाखेकडून गुरुवारी मिळाली आहे.

# दिशा प्रतिष्ठान समाधानी क्षणांची अनुभूती - मुसळे



**लातूर/प्रतिनिधी**

बारीकराव मुसळे यांचा अपघात झाला होता आणि अपघातात पायाला मोठ्या प्रमाणात इजा झालेली होती व घरची आर्थिक परिस्थिती नाजूक शस्त्रक्रियेची गरज या दोन्ही बाबींशी झुंज देत असताना आर्थिक परिस्थिती ही खूप मोठी अडचण होती. दिशा प्रतिष्ठान हितचिंतकांच्या माध्यमातून दिशा प्रतिष्ठानला संपर्क केला गेला. गरजूंना शिक्षण आणि आरोग्यासाठी अविरत मदत करणाऱ्या दिशा प्रतिष्ठानच्या वतीने विनंती वरून बारीकराव मुसळे यांच्या शस्त्रक्रियेसाठी मोलाचे सहकार्य करून अजून एकदा माणुसकीचा परिचय मानसिक आधार देत पूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या. दिशा प्रतिष्ठानच्या सर्वच संचालकांचे एखाद्या गरजूला मदत करण्याच्या तळमळीला खूप मोठे यश मिळाले. दिशा प्रतिष्ठानद्वारा अविरत वैद्यकीय सेवेचे व्रत अखंड चालू असल्याने लातूरकरांच्या मनातील विश्वास दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

# मंद्रूपच्या तहसीलदारांनी केली कृषी भांडार दुकानाची तपासणी



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सध्या शेतकऱ्यांना विविध उत्पादन घेत असताना अनेक प्रकारचे बी-बियाणे,खतांची गरज भासत असते.कृषी सेवा दुकानदारांनी शेतकऱ्यांना शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार बी-बियाणे, औषधे, खते उपलब्ध करून द्यावेत काही अडचणी उदभवल्यास कृषी विभागाशी अथवा तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधावेत असे आवाहन मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांनी केले. सध्या पावसाळा सुरू असून शेतकऱ्यांना पेरणीसाठी विविध बी-बियाणे इतर पिकांसाठी खतांची गरज आहे. मात्र मंद्रूपसह परिसरातील काही खत दुकानांमध्ये बी-बियाणे, औषधे व खते उपलब्ध नसल्याची ओरड शेतकऱ्यांतून होत होती. याची प्रतिक्रिया समाज माध्यम उमठल्यावर मंद्रुप अप्पर तहसीलदार लिंबारे यांनी यांची तातडीने दखल घेत मंद्रूप येथील कृषी दुकानास भेटी देऊन उपलब्ध बी बियाणे व खतांची माहिती घेतली. या हंगामामध्ये शेतकऱ्यांना देण्यात येणारे बियाणे, खते योग्य आहेत की नाहीत यांची पाहणी केली. तसेच बियाणे व खतांचा साठा किती आहे. मागणीनुसार बियाणे, खते उपलब्ध आहे का? यांचीही माहिती घेतली. संपूर्ण हंगाम संपेपर्यत बी-बियाणे व खतांचे योग्य नियोजन करून ते शेतक-यांना वेळेवर उपलब्ध करून द्यावेत. कोणत्याही परिस्थितीत बी-बियाणे, औषधे आणि खतांचा काळाबाजार करू नये तसे केल्यास अथवा त्यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित दुकानावर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना बी बियाणे अथवा खते खरेदी करताना काही अडचणी उदभवल्यास संबंधित कृषी विभाग अथवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार राजशेखर लिंबारे यांनी शेतकऱ्यांना केले आहे. मंद्रूप येथील खत दुकानास मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांनी भेट देऊन पाहणी करून उपलब्ध बियाणे व खतांची माहिती घेतली.

# अशिलल व्हिडीओ करून खंडणी वसुल करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अहमदपूर/फिरोज शेख**

एका महिलेने साथिदाराच्या स्वताचे एका इसमासोबत अश्लील चित्रीकरण करून धमकी देत पंधरा लाख रुपये खंडणी वसूल केल्याची घटना अहमदपूर पोलिस ठाणे हाद्दीत घडली आहे. या प्रकरणी अहमदपूर पोलिस ठाण्यात एका महिलेसह तिच्या दोन साथीदारा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील भारत कॉलनीत राहणारी रूपाली ढगे व इतर दोघांनी उदगीर तालुक्यातील सुकणी येथील शेतकरी विठ्ठल दिगंबर मुळे ७२ वर्ष यांची माहिती काढून आपल्या खंडणीचा सावज शोधला. मागील महिन्यात ते विठ्ठल मुळे यांच्या शेतात गेले व त्यांना मद्य पाजले, दरम्यान अश्लील चित्रीकरण केले. या नंतर ५ मे ते १५ जुन पर्यंत आरोपी असलेल्या दोन इसमांनी आम्ही पोलिस आहोत व तुझ्या विरोधात बलत्काराचा गुन्हा दाखल करतो अशी धमकी देत पहिल्या वेळी १० लाख, दुसऱ्या वेळी ४ लाख असे एकूण १४ लाख रूपये मौजे सुकणी, शिरुर ताजबंद व तळेगाव रोड अहमदपूर या ठिकाणी ही खंडणी वसूल केली. या संदर्भात आरोपी महिला व तिचे साथीदार पुन्हा वेळोवेळी पैशांची मागणी करीत राहिल्याने फसवणूक झालेल्या इसमाने अहमदपूर पोलिस स्टेशनला माहिती दिली. दरम्यान आरोपींनी १५ जुन रोजी दोन लाख आणण्याची मागणी केली परंतु एक लाख द्यावयाचे ठरले व त्या प्रमाणे अहमदपूर बस स्थानकात दुपारी चार वाजता ठरलेला व्यवहार करीत असताना पोलीसांनी आरोपीस रंगेहात पकडले असून या संदर्भात बुधवारी रात्री उशीरा अहमदपूर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.मुसा शेख यास व्यवहार करताना तर रूपाली ढगे हीस काळेगाव रोडवरून अटक करण्यात आली असुन तिसरा आरोपी गुलाबसाब शेख फरार आहे.या घटनेचा पोलिस उपविभागीय अधिकारी बलराज लंजीले, पोलिस निरीक्षक कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र केदार हे करित आहेत.

# दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद गट अबीटघर व पंचायत समितीच्या मोज गटातील दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा जाहीर गुणगौरव करण्यात आला. शुक्रवारी (दि.१ जुलै) अबीटघर येथील महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार, सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जि.प.सदस्या भक्ती वलटे, माजी उपसभापती जगदिश पाटील, मृणाली नडगे वाडा तालुका महिला अध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टि, महेश भोईर अध्यक्ष युवक राष्ट्रवादी काँग्रेस, राहुल वेखंडे उपाध्यक्ष युवक राष्ट्रवादी काँग्रेस वाडा तालुका, एकनाथ वेखंडे अध्यक्ष हायस्कुल अबिटघर, शंकर पाटील गुरुजी सामाजिक कार्येकर्ते व इतर कार्यकर्ते हजर होते. सदरच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी कमळाकर गोळे होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवव्याख्याते स्वप्निल पाटिल यांनी केले.

# तिळगाव येथून तीन बांगलादेशींना अटक



**वाडा/प्रतिनिधी**

बांगलादेशात बेकारी व बेरोजगारीमुळे रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाल्याने अनेक जण कायद्याच्या पळवाटांचा वापर करून भारत देशात अवैध रित्या घुसखोरी करून खेड्यापाड्यात राहून उपजीविका भागावण्याचा खटाटोप करत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशाच प्रकारे वाडा तालुक्यातील तिळगाव येथील पासपोर्टशिवाय वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशी नागरिकांना वाडा पोलिसांनी शनिवारी (दि २५ जून) अटक केली आहे.

वाडा पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार तिळगाव येथील शिसील बायो कॅम्प या कंपनीतून कादर अली मोहम्मद अली खान (वय ५०), अब्दुल सलाम अब्दुल फजल शेख (वय ४८) व झाहिद युनुस खान (वय २२) या तिघांना अटक केली आहे. भिवंडी येथील मजूर पुरवणारा कंत्राटदार फरीयाद सादिक खान याने हे तिघे भारतीय असल्याचे खोटे सांगून शिसील बायो कॅम्प या कंपनीत कामाला लावले होते. हे तिघे या कंपनीत काम करून कंपनीतीच वास्तव्य करून होते. अधिक तपास वाडा पोलीस करत आहेत. आपल्या गाव, पाड्यात व परिसरात बांगलादेश नागरिक अवैद्य रित्या वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले तर सुज्ञ नागरिकांनी वाडा पोलिसांना कळविण्याचे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी केले आहे.

# सहाराईत गुन्हेगार नितीन कांबळे स्थानबद्ध



**सोलापूर/प्रतिनिधी**

विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार नितीन उर्फ निखिल मारुती कांबळे (३२) याच्यावर एमपीडीए अन्वये पोलिसांनी स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. नितीन कांबळे हा मागील अनेक वर्षापासून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी दहशत निर्माण करून गुन्हेगारी वर्तन केले आहे. त्याच्याविरुद्ध शहरातील विजापूर नाका, फौजदार चावडी, सदर बाझार, एमआयडीसी पोलीस ठाण्यात ६९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. घातक शस्त्र घेऊन जबरी चोरी, घरफोडी, खंडणी, धमकी देणे, हल्ला करणे, मारामारी करणे, विनयभंग करणे आदी गुन्हे तो करीत असल्याबद्दल त्याच्यावर यापूर्वीही पोलिसांनी कारवाई केली आहे. परंतु त्याच्या गुन्हेगारी वर्तनामध्ये कोणतीच सुधारणा झाली नाही. यामुळे नितीन कांबळे याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी स्थानबद्धतेचे आदेश दिले. सोलापूर शहर पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी सोलापुरात पदभार घेतल्यापासून स्थानबद्धतेची ही पहिली कारवाई आहे. ही सदरची कारवाई पोलीस उपायुक्त बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, पोलीस उपनिरीक्षक वीरेंद्रसिंह बायस यांच्या पथकाने केली आहे.

# वाडा बस स्थानकात खाजगी बसमुळे वाहतूक कोंडी



**वाडा/प्रतिनिधी**

पूर्वीप्रमाणे बस वाहतूक सुरळीत सुरू झाली असून जवळच्या व लांब पल्ल्याच्या बस वाहतूक नियमित चालत आहेत. वाडा बस स्थानक हे मध्यवर्ती ठिकाणी असल्याने प्रवाशांची वर्दळ जास्त असते तर दुपारच्या सुमारास शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सुट्टी झाल्यानंतर गर्दीत अजूनच भर पडते. मंगळवारी (दि.२८जून) दुपारच्या सुमारास विद्यार्थ्यांची सुट्टी झाल्यानंतर वाडा बस स्थानकावर विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असताना वाडा बस स्थानकात एक खाजगी बस येऊन थांबली, या बस मधील प्रवाशी उतरेपर्यत बाहेरगावाहून आलेल्या एस टी च्या बसला गाडी लावणे, फिरवणे व बाहेर पडण्यास या बसचा अडथळा झाल्याने वाहतूक कोंडी होऊन बस चालक, विद्यार्थी व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. बस स्थानकातील वाहतूक नियंत्रक बस स्थानकात खाजगी वाहने लावू नये असे वारंवार सांगत असूनही खाजगी वाहने सर्रास बस स्थानकात लावली जात आहेत. वाडा बस स्थानकात बेकायदेशीर लावण्यात येणाऱ्या चारचाकी व दुचाकी वाहन चालकांवर कायदेशीर कारवाईची मागणी वाडा तालुका प्रवासी संघटनेचे सचिव प्रा.किरण थोरात यांनी केली आहे.

# मातृभाषेतून घेतलेले शिक्षण सर्वोच्च शिक्षण -राहुल सोलापूरकर



**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्यावतीने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उत्तुंग यश संपादन करणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळा दयानंद सभागृहात संपन्न झाला.मातृभाषेतून घेतलेले शिक्षण सर्वोच्च शिक्षण असते असे मत प्रसिद्ध सिनेअभिनेते व नाट्य कलावंत राहूल सोलापुरकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना व्यक्त केले. याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष जितेश चापसी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, जिल्हा संघचालक संजय अग्रवाल, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अप्पाराव यादव, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुरपे, प्रा. चंद्रकांत मुळे,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, प्रविण सरदेशमुख, केशवराज प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष डॉ.मनोज शिरुरे, स्थानिक व्यवस्था मंडळ अध्यक्ष यशवंतराव देशपांडे तावशीकर, रेनिसन्स सीबीएससी स्कूलचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शिशूवाटिका अध्यक्षा योगिनीताई खरे, आस्था संकुलाचे प्रमुख उमेश गाडे, जनसंपर्क अधिकारी राहूल गायकवाड, केशवराज माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल वसमतकर, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे, रेनिसन्स सीबीएससी स्कूलच्या प्रधानाचार्या अलिशा अग्रवाल हे उपस्थित होते.

सोलापुरकर म्हणाले की, भाषेचं सामर्थ्य खूप मोठं असून प्रत्येक भाषेचं स्वतंत्र व्याकरण असतं. त्यानुसारच विचार करावा हे सांगताना त्यांनी माणसाच्या वयानुसार त्याला शिकवणारी बाराखडी फक्त मराठी भाषेतच असल्याचे सांगितले. आपल्या भाषेवर प्रेम करा. आपण सूर्य ज्या दिशेला उगवतो त्या दिशेचे म्हणजेच पौर्वात्य आहोत म्हणून सूर्य ज्या दिशेला मावळतो त्या पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण न करता आपली संस्कृती व संस्कार जपा. आई-वडिलांनी आपल्या इच्छा-आकांक्षा मुलांवर न लादता मुलांची क्षमता व आवडीनुसार त्याला निर्णय घेण्यास सांगावे. स्वतः फक्त मार्गदर्शकाची भूमिका बजवावी हे सांगितले. घरात राहून संपूर्ण कुटुंबाचं व्यवस्थापन सांभाळणारी,एकाच वेळी अनेक भूमिका पार पाडणारी गृहिणी ही एखाद्या कंपनीच्या चेअरमन पदी बसलेल्या स्त्रीपेक्षाही मला श्रेष्ठ वाटते, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी कितीही मोठे यश मिळवले तरी आपले पाय जमिनीवरच राहतील.माता आणि मातृभूमी यांच्याप्रती सदैव कृतार्थ राहतील याचे भान ठेवावे असे मत व्यक्त केले. प्रारंभी मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेतील ४ तथा शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १५७ गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा सत्कार संपन्न झाला. ...पान ६ वर

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन




**वाडा/प्रतिनिधी**

उत्पादन व खर्च यांचा मेळ बसत नसल्याने भात शेतीची लागवड रोजगार हमीतून करून घ्यावी, केंद्र व राज्य शासनाकडून भात खरेदी वर देण्यात येणारा बोनस तातडीने देण्यात यावा, भात खरेदी आधारभूत केंद्राची संख्या वाढवून भातासोबत गवत आणि पावली यांची खरेदी आधारभूत केंद्रावर करण्यात यावी, कोकणातील सर्व नद्या नाल्यावर कोल्हापूर पद्धतीने बंधारे बांधून बारमाही सिंचनाची व्यवस्था करून कोकणातील सिंचनाचा अनुशेष भरून काढावा, पालघर जिल्ह्यात शेतीवर आधारित उद्योग धंद्याची निर्मिती करावी, सर्व पिकांना आधारभूत किंमत दिली जावी, कुकुट पालन करनाऱ्या शेतकऱ्यांची खाजगी कंपन्यांकडून होणारी पिळवणूक थांबून त्यांना योग्य तो न्याय द्यावा, युरिया खताच्या काळ या बाजारावर नियंत्रण आणून झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी, शासनाच्या विविध प्रकल्पांमध्ये संपादन केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, सन २०१७ साली केलेला कर्जमाफीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करावी, तहसीलदार यांच्या आदेशाने ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील नोंदी त्वरित कमी करण्याबाबत आदेश द्यावा, आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना थकीत कर्जमाफी मिळत नाही तसेच नियमित कर्ज भरणारे शेतकरी जे टॅक्स पेयर आहेत त्यांना देखील कर्जमाफी ...पान ६ वर

# शेती हाच अन्नाचा प्रमुख आधार-दिलीप स्वामी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**




माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे कृषी क्षेत्रात मोठे योगदान आहे. उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती हे जरी म्हण असली उत्तम शेती हाच मोठा पर्याय आहे. असे मत सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले. कृषी दिना निमित्त माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे जन्मदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या बोलत होते. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, आत्माचे संचालक दशरथ तांबाळे, डाळींब संशोधन केंद्रांचे डॉ. अमृतसागर, आत्माचे सहसंचालक मदन मुकणे, जिल्हा कृषी अधिकारी कुंभार प्रमुख उपस्थित होते. भविष्यातील शेती समोरील आव्हानांना सामोरे जावे लागणार असल्याचे सांगून शेतकरी हा जगाचा पोशींदा आहे. शेती आहे तर भाकरी आहे. असे सांगून सिईओ दिलीप स्वामी म्हणाले, शेतीचे उत्पादन वाढविणेचे महत्वाचे काम माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी केले. त्यांचे शेती क्षेत्रातील योगदान कोणी विसरू शकणार नाही. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा करणेचा निर्णय घेतला. मी पुसद उपजिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. स्वतः नाईक यांची शेती मी पाहिली आहे. मुख्यमंत्री पदावर राहिलेली व्यक्ती पदावर असताना व नसताना देखील शेतीत रमणार व्हायची. त्यांना मातीची ओढ होती म्हणून त्यांनी कृषी क्षेत्रात मोठे काम केले.

शेतकरी यांची मुले कलेक्टर झाली पाहिजे. कारखानदार झाली पाहिजे हे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे स्वप्न होते. त्या साठी त्यांनी प्रयत्न केले. आता परिस्थिती बदलत आहेत. शेतकरी यांचे मुले कारखानदार झाली. जिल्हाधिकारी झाली आहेत. वसंतराव नाईक यांचे स्वप्न साकार होत आहे. कृषी क्षेत्रातील अर्थ पुरवठा लक्षण होणे साठी त्यांनी दिलेले येगदान महत्वपुर्ण आहे. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे म्हणाले, कृषी क्षेत्राला बळकटी देणेच काम वसंतराव नाईक यांनी केले. त्यांचे शेती विषयक विचार व त्या दृष्टीने केलेली कृती महत्वपुर्ण आहे. ...पान ६ वर

# विषमता हा विकासातला अडसर असल्याने ती ठरवून दूर करण्याचे काम शाहू महाराजांनी केले-डॉ.अनिल जायभाये

**लातूर/प्रतिनिधी**



विषमता हाच या देशातील बहुसंख्याकांच्या विकासातील मुख्य अडसर असल्याने ती जाणीवपूर्वक दूर करुन, उपेक्षितांना न्याय देण्याचे महान कार्य लोकराजा शाहू महाराज यांनी केले,असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्रातील सामाजिक शास्त्रे विभागाचे प्रा.डॉ.अनिल जायभाये यांनी येथे केले. लातूरच्या हरिभाऊ नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात रविवार, दि.२६ जून २०२२ रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या १४८ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.जायभाये बोलत होते, अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष प्रभाकर कापसे हे होते. पुढे बोलताना डॉ.अनिल जायभाये म्हणाले की, मुठभर चाणाक्षांनी या देशातल्या बहुसंख्य समाजाच्या विकासात नेहमीच अडथळा आणला आहे किंबहुना सर्वच प्रकारच्या क्षेत्रात विषमता निर्माण करुन, ती मुद्दाम जोपासत बहुजनांच्या विकासात अडथळा आणला. ही नेहमी कोंडी प्रत्यक्ष कृतीतून फोडण्याचे ऐतिहासिक कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. फुले-शाहू-आंबेडकर या महामानवांच्या कृतीशील विचारधारेतूनच देशाची प्रगती होणार आहे, असे सांगून डॉ.जायभाये यांनी सार्वजनिक ग्रंथालयांनी वाचन संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार करण्यासोबतच परिघाबाहेरील समाज, त्यांचे प्रश्न, समाजासमोर मांडण्यासाठीच्या उपक्रमांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. या देशातील भटके विमुक्त,अल्पसंख्य, ओबीसी, दलित आणि उपेक्षित या परिघाबाहेरील घटकांचा आवाज आजही प्रस्थापित व्यवस्थेत गुंजत नाही, लातूरच्या ७० वर्षाच्या इतिहासात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक आणि उपेक्षितांच्या व्यस्था-वेदनांना शब्दबध्द करण्याचे काम आम्ही लातूर परिघावरचा ...पान ६ वर

# शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी मोहिमे अंतर्गत क्षेत्रीय भेटी व तांत्रिक मार्गदर्शन



**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत कृषी संजीवनी मोहिमे अंतर्गत क्षेत्रीय भेटी व तांत्रिक मार्गदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.२५जून) वाडा तालुक्यातील सांगे व खरीवली-कोहोज येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी सांगे येथील कृषि भुषन अनिल पाटील यांचे क्षेत्रावर भेट दिली व भात लागवड यंत्रा द्वारे लागवड करणे साठी ट्रे मधील भात. रोपवाटीकेची व भात लागवड यंत्राची पहाणी करून भात शेतीतुन शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन वाढवणेसाठी यांत्रीक शेतीचे महत्व या बाबत तांत्रीक मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी विभागीय कृषि सहसंचालक ...पान ६ वर

# माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची १०९वी जयंतीनिमित्त विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

वसईतील कॉंग्रेस हॉल पारनाका येथे राष्ट्रीय बंजारा टायगर्स व वसई विरार जिल्हा कॉंग्रेस कमिटी व्हिजेएनटी सेल तसेच विजय शेठ पाटील फाउंडेशन यांच्या वतीने व आनंद चव्हाण (जिल्हा अध्यक्ष विमुक्त जाती भटक्या जमाती सेल) यांच्या नेतृत्वाखाली हरितक्रांतीचे जनक महानायक, माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांची १०९वी जयंती तसेच १०वी, १२वी यशस्वी १०९ विद्यार्थीचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्व.वसंतराव नाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही घडलो व लहानपणा पासून त्यांचा सहवास व आशिर्वाद मिळाला. आज माझा योगायोग स्व.वसंतराव नाईक साहेबांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद मिळाले ते मी माझे भाग्य समजतो असे आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना कॉंग्रेस नेते विजय पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांनी स्व.वसंतराव नाईक यांच्या जीवनावर संपूर्ण माहिती विद्यार्थीना दिले. सदर कार्यक्रमाला प्रमूख अतिथी वसईतील दानशुर व प्रदेश कॉंग्रेस कमिटी सरचिटणीस विजय शेठ पाटील व ओनिल आल्मेडा जिल्हाध्यक्ष वसई विरार शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी, तसेच मच्छिंद्र ए. चव्हाण मुख्य संपादक साप्ताहिक जनहित एक्सप्रेस,ि वलास जाधव प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रीय बंजारा टायगर्स, किरण शिंदे जिल्हा कार्यालय सरचिटणीस वसई विरार जिल्हा कॉंग्रेस, सलीम खिमाणी अध्यक्ष वसई विरार अल्पसंख्याक विभाग, ...पान ६ वर

# वाड्यातील प्रशिक्षण हॉल येथे विद्यार्थी संवाद कार्यक्रम संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

संगणक प्रशिक्षण देणाऱ्या वाड्यातील नामवंत संस्थेच्या वतीने रविवारी (दि.२६ जून) विद्यार्थी संवाद या विद्यार्थ्यांना प्रबोधन पर शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात शिक्षणाचे नवे क्षितीज- संधी आणि व्यापकता, इयत्ता दहावी बारावी विद्यार्थ्यांचे मानसिक स्थैर्य आणि करियर, तसेच व्यक्तिमत्व विकास काळाची गरज या विषयांवर प्रसिद्ध वक्ते हृषीकेश सावंत, नवनाथ शिंदे आणि विशाल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी प्रबोधन पर संवाद साधला. विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले, तर त्यांचा पुढील शैक्षणिक जीवन प्रवास सुकर होईल या कल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित केल्याचे संस्थेचे संचालक कल्पेश ठाणगे यांनी सांगितले. यावेळी १०वी बोर्ड परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवीलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित ...पान ६ वर

# खास. सुप्रिया सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त गातेस येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडीतर्फे वृक्षारोपण



**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त वाडा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने गुरुवारी (दि.३०जून) गातेस (बु.) येथे वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी अनेक झाडे लावण्यात आली. तर सर्व कार्यकर्त्यांना केक भरवून वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वाडा तालुका महिला अध्यक्षा मृणाली नडगे, जिल्हा परिषद सदस्य भक्ती वलटे, सभापती रघुनाथ माळी, माजी उप सभापती व सदस्य जगदीश पाटील, नगरसेविका सुचिता पाटील, पूनम पथवा, सुचिता फराड, विराज पाटील, शहर अध्यक्ष अश्विनी भोईर यांच्यासह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# विरारचे मंडळ अधिकारी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**वसई/प्रतिनिधी**



वसई तहसील मधील विरार सजा येथील मंडळ अधिकारी असलेले प्रल्हाद खेडकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने वसई येथील रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे वसई तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यामध्ये शोककळा पसरली आहे.

विरार मंडळ अधिकारी म्हणून गेल्या काही वर्षांपासून काम करीत असलेले प्रल्हाद खेडकर हे अतिशय साधे स्वभावाचे व मनमिळावू व्यक्ति म्हणून त्यांची ओळख होती. गेल्या आठवड्यात त्यांना अचानक खोकल्याचा त्रास होऊ लागला म्हणून त्यांना वसईतील एका खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचारार्थ त्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. त्यांच्या अचानक जाण्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अहमदनगर येथे त्यांच्या मुळगावी त्यांचावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पक्षात यांची पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो!

# गावठी कट्टा व जिवंत काडतुसह आरोपी गजाआड

## पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी



**विरार/प्रतिनिधी**

रिव्हॉल्वर बाळगणाऱ्या आरोपीला पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने नुकतीच ताब्यात घेऊन अटक केली आहे. गुरुवारी दि.३० जुन रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास वालईपाडा, संतोष भुवन, नालासोपारा (पूर्व) येथे राहणारा आरोपी सुरज शर्मा याच्याकडे विना परवाना व बेकायदेशीररित्या अग्निशास्त्र असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळाली होती. माहिती मिळताच गुन्हे प्रकटीकरण पथकाची चक्रे फिरली. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून आरोपीचा शोध घेऊन त्याला शिताफीने ताब्यात घेतले. आरोपी सुरज शर्मा हा मूळ उत्तर प्रदेश येथील असून तो राहत असलेल्या गाळ्यात खड्डा करून त्यामध्ये पुरून ठेवलेला एक गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस व एक रिकामी पुंगळी जप्त करण्यात आली आहे. सुरज शर्माच्या विरोधात पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ५६८/२०२२ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिमंडळ-३चे पोलीस उपायुक्त प्रशांत वाघुंडे, विरार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ...पान ६ वर